MAHMARI 19358/13/1/2000 -TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकविसावे/अंक ७/जुलै २०२०

## संपादकीय

## लोकमान्य टिळकांचा शिक्षण विचार

(२३ जुलै १८५६ - १ ऑगस्ट १९२०)



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक म्हणजे भारतभूला पडलेले एक सोनेरी स्वप्न होय. भारतीय विचार परंपरेचे साक्षेपी चिंतन, दुर्दम्य उत्साह, जीवनाकडे पाहण्याची ऊर्जस्वल दृष्टी, प्रखर विद्वत्ता आणि देशप्रेम यांचा मूर्तीमंत आविष्कार म्हणजे लोकमान्य टिळक. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या भाषेत सांगायचे झाले तर, 'टिळकांचे चरित्र म्हणजे विशाल द्रष्टेपणा व अदम्य कर्तेपणा यांचा भव्य संगम होय' टिळक चरित्र म्हणजे १८८५ ते १९२० पर्यंतच्या आधुनिक भारताच्या इतिहासाचा गाभा होय. ते एक प्रत्यक्षात घडलेले महाकाव्य आहे. हे महाकाव्य साहित्य रूपात प्रकट करणारा प्रतिभासंपन्न चरित्रकार मात्र अजून झाला नाही. परंपरागत आध्यात्मिक भारतीय संस्कृतीच्या कुशीत जन्मलेला व आधुनिक संस्कृतीच्या सिंहिणीच्या स्तनाचे सकस दूध प्राशन केलेला हा 'बाळ' आहे. या दुधाची त्यांनी आपल्या लेखनात अनेकदा विशेष प्रशंसा केली आहे. पहिल्या विद्यार्थी दशेतील विचारांच्या उष:काळात त्यांना भारतीय भावी स्वराज्याचे दिव्य स्वप्न दिसले. ते स्वप्न प्रत्यक्ष सृष्टीत पाहण्याचा जो ध्यास लागला या ध्यासाने त्यांचे सर्व जीवन अखेरपर्यंत भारले गेले. लोकशाही स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे भारतव्यापी अधिष्ठान निर्माण करणारे अग्रणी आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कर्तृत्वाला सफल करणाऱ्या लोकशाही शक्तींना गांधींच्या पूर्वी जागृत करणारा दिव्य 'दिनमणी' म्हणजे लोकमान्य टिळक होत. विद्यार्थीदशा संपल्यापासून अखेरपर्यंत सतत ४५ वर्षे एकाच ध्येयाच्या दिशेने सर्व प्रकारे वैचारिक व सांसारिक मोह टाळून सतत संग्रामस्थ राहणे हाच टिळकांच्या द्रष्टेपणाचा अस्सल निकष आहे. (लोकमान्य टिळक लेखसंग्रह, साहित्य अकादमी प्रकाशन)

टिळकांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचे साकल्याने अध्ययन करण्यासाठी तेव्हा प्रचलित असलेल्या विचारधारा

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

समजून घेणे अगत्याचे ठरते. सार्वजनिक जीवनात सर्वस्व अर्पण करण्याची मानसिक तयारी टिळकांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच केली होती. तेव्हा एकूण चार मतप्रवाह अस्तित्वात होते. त्यातील पहिला विचारप्रवाह ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत दारिद्र्यात खितपत पडलेल्या व दुःख सहन करीत दिवस कंठणाऱ्या जनतेची केविलवाणी दशा पाहून सुशिक्षितांचा मूठभर गट उद्विग्न होऊन विचार करणाऱ्या लोकांचा होता. या गटाला असे वाटे की, या देशातील अधोगती इंग्रजांच्या परकीय राज्य सत्तेमुळे झाली असून यावर सशस्त्र क्रांतिवादी विचार हाच उपाय आहे. या गटात नेताजी सुभाष चंद्र बोस येतात. दुसरा मतप्रवाह असा होता की, भारताच्या अधोगतीचे कारण भारताची परंपरावादी धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक रचना जबाबदार आहे असे मानणाऱ्यांचा. धर्मातील अंधरूढी, जातिभेद व त्यांना कारणीभूत असलेली अंधश्रद्धा नष्ट झाल्याशिवाय भारत नव्या राज्य पद्धतीस पात्र होणार नाही असे त्यांना वाटे. या विचारधारेचे लोक ब्रिटिश राज्यकर्त्यांना भारताच्या अवनतीचे कारण समजत नसत. या विचारधारेत राजा राममोहन रॉय, महात्मा ज्योतिराव फुले, लोकहितवादी ईश्वरचंद्र विद्यासागर, डॉ. रा. गो. भांडारकर, रँग्लर परांजपे इत्यादिकांची गणना होते. तिसरा मतप्रवाह हा सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा एकत्र व्हावयास पाहिजेत असा विचार मांडणारा होता. यामध्ये मुख्यत्वाने न्यायमूर्ती म. गो. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी नेमस्त राजकीय नेते होते. चौथा विचार प्रवाह म्हणजे अधोगतीस मुख्यतः परकीय राज्यसत्ता जबाबदार धरून राजकीय सुधारणेसाठी प्राधान्य देणे अधिक न्याय्य, अधिक इष्ट, अधिक शक्य आहे असे म्हणणाऱ्यांचा होता. त्यांचे सर्वश्रेष्ठ नेते म्हणजे लोकमान्य टिळक होत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे टिळकांनी दुसऱ्या व तिसऱ्या विचार प्रवाहातील लोकांवर सडकून टीका केली आहे. त्यांच्या मते राजकीयदृष्ट्या मवाळ अशा समाजसुधारकांमध्ये केवळ बोलके, अंगचुकार, संधीसाधू व ब्रिटिश सत्तेच्या धार्जिण्या अट्टल स्वार्थी लोकांचा भरणा मोठा होता. लहान-मोठ्या ब्रिटिश सत्ताधीशांना खुश करू पाहणारे खुशमस्करी त्यात थोडेथोडके नव्हते. याच कचखाऊ सुधारणांमुळे सामाजिक सुधारणेचे आंदोलन मागे पडले असे टिळकांनी लिहिले आहे. टिळकांच्या या भूमिकेमुळे सशस्त्र क्रांती क्रांतिकारकांचा मोठा गट त्यांच्याकडे आकृष्ट झाला. ज्यामध्ये चाफेकर बंधू, स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी क्रांतिकारक येतात. टिळकांचे संपूर्ण आकलन करण्यासाठी वरील चार मतप्रवाह समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

प्रस्तुत लेखामध्ये टिळकांचे शिक्षण विषयक विचार समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. टिळकांच्या दृष्टिकोनातून पाश्चात्य शिक्षण व पारंपारिक भारतीय शिक्षण या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या होत्या. लोकमान्य टिळकांनी दिलेल्या चतुःसूत्री मध्ये राष्ट्रीय शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे होते. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आगरकर व टिळक यांच्या सहकार्याने राष्ट्रीय तेजस्वी शिक्षण देण्याकरिता खाजगी माध्यमिक शाळा स्थापन करण्याचा उपक्रम केला. या उद्देशाने डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली.

'पुनश्च हरिओम' या केसरीतील प्रसिद्ध लेखात टिळक म्हणतात की 'ज्यावेळी हिंदुस्तानातील लोकांस कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे या प्रश्नाची वाटाघाटी होऊन पाश्चिमात्य पद्धतीने इंग्रजी भाषेत शिक्षण द्यावे असा ठराव झाला, तेव्हा सदर ठराव करणाऱ्यांची बुद्धी हल्लीच्या लॉर्ड कर्झन सारख्या अधिकाऱ्याप्रमाणे

(पृष्ठ क्र. ३७ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

## वर्ष एकविसावे/अंक ७/जुलै २०२०

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक १ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | |
| २) | आयझॅक न्यूटन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | पांढरा गुलमोहर | प्रकाश दुधाळकर | ६ |
| ४) | कोरोना वायरस परिणाम : चीन संकटात, भारताला संधी | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | ८ |
| ५) | शीतयुद्ध (Cold War) | सहा. प्रा. सुभाष गं शिंदे | ११ |
| ६) | संगीत मनमोही रे भाग १ : सप्तसूर आणि स्वरांगण | डॉ. कीर्ती आगाशे | १९ |
| ७) | खेडेगाव.. | महेश काळे | २० |
| ८) | मराठी असे आमुची मायबोली | सौ. मनिषा चव्हाण | २३ |
| ९) | संवेदनशीलता | स्वप्नील नंदकुमार मयेकर | २५ |
| १०) | आठवड्याचा बाजार | स्वप्नील नंदकुमार मयेकर | २६ |
| ११) | एक कप च्या : चित्रपट समीक्षण | प्रा. श्रीपाद जोशी | २८ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. ‘दिशा’च्या संदर्भात

- आपण ‘दिशा’ नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून ‘दिशा’ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर ‘दिशा’चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# आयझॅक न्यूटन

*आयझॅक न्यूटन (Isaac Newton) हे नाव विज्ञान जगतात फारच मोठे आहे. ३३३ वर्षांपूर्वी ५ जुलै १६८७ रोजी त्याने आपले पहिले संशोधनपर पुस्तक प्रसिद्ध केले. त्या निमित्ताने दिशा मासिकाच्या वाचकांसाठी न्यूटनच्या जीवनाबद्दल माहिती देण्यात आली आहे.– संपादक*


संपूर्ण जग आता करोना महामारीच्या प्रभावाखाली आहे. त्याचा वेगाने प्रसार होत असल्याने सर्वत्र टाळेबंदी जाहीर करण्यात आली आहे. सर्व शाळा आणि महाविद्यालये सध्या बंद आहेत. अशीच परिस्थिती साडे तीनशे वर्षांपूर्वी आली होती. १६६५ ला इंग्लंड मध्ये प्लेगची साथ आली. त्याकाळी प्लेग या आजारावर उपचार उपलब्ध नव्हते. त्यामुळे शैक्षणिक संस्था बंद करण्याखेरीज दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. आयझॅक न्यूटन त्यावेळी केंब्रिज विद्यापीठातील ट्रिनिटी कॉलेज (Trinity College, Cambridge) मध्ये शिकत होते. १६६५ मध्ये त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची स्नातक पदवी मिळवली होती. स्नातकोत्तर शिक्षणासाठी त्याने आपले नाव देखील नोंदविले होते. परंतु प्लेगच्या साथीमुळे त्याच्या शिक्षणात खंड पडला. त्याला केंब्रिज सोडून आपल्या गावी जाणे भाग पडले.?



**ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिज**

प्लेगच्या साथीमुळे देशभर हाहाकार उडाला. सर्व सुरळीत व्हायला जवळजवळ दोन वर्षे लागली. त्यामुळे न्यूटनला एवढा काळ आपल्या गावी राहूनच काढावा लागला. आयझॅक हा स्वभावाने एकलकोंडा होता. वाचनाची त्याला खूप आवड होती. ट्रिनिटी कॉलेजच्या समृद्ध वाचनालयाने त्याची वाचनाची आवड चांगलीच जोपासली. वाचनालयात उपलब्ध असलेल्या विस्तृत संग्रहातून खगोलशास्त्राची पुस्तके आणून तो वाचत असे. ते वाचताना अनेक प्रश्न त्याच्या मनात निर्माण होत असत. हे ग्रह सूर्याभोवती फिरत का राहतात? चंद्र पृथ्वी भोवती फिरत का राहतो? समुद्राला भरती–ओहोटी का येते? पौर्णिमेची भरती मोठी का असते? असे अनेक प्रश्न त्याच्या मनात होते. सुट्टीच्या काळात घडलेल्या एका अनपेक्षित घटनेने त्याच्या या प्रश्नांची उकल झाली. त्या दिवशी शेतात तो सफरचंदाच्या झाडाखाली बसला होता. योगायोगाने त्याचवेळी एक सफरचंद खाली पडले. असे का झाले असावे? याचा विचार करीत असताना त्याला दोन वस्तूं मधील आकर्षणाची कल्पना सुचली. यातून गुरुत्वाकर्षणाचा नियम तयार झाला. त्याने दोन वस्तूंमधील आकर्षणाचे गणितीय सूत्र बनविले. दोन वस्तूंमधील बल हे त्यांच्या वस्तूमानाच्या गुणाकाराच्या सम प्रमाणात तर अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणात असते असे सूत्र त्याने मांडले. त्याचबरोबर गतीविषयक नियम देखील त्याने तयार केले. त्याचे हे नियम विज्ञानाच्या प्रगतीच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे होते. ते जगाला माहीत होणे आवश्यक

होते. परंतु आपल्या संशोधनाचे प्रकाशन करण्याचे काम मात्र न्यूटन पुढे ढकलत राहिला. एडमंड हॅले नावाच्या एका खगोलशास्त्रज्ञाने त्याच्या पाठीमागे प्रकाशनाचा तगादा लावला. मित्राच्या आग्रहास्तव त्याने गतीशास्त्रावरचे आपले सिद्धांत पुस्तकरूपात प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाचे नाव 'फिलॉसाफी नॅचरॅलिस प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका' (Philosophie Naturalis Principia Mathematica) असे होते. हे पुस्तक लॅटिन भाषेत लिहिले असून लंडनच्या रॉयल सोसायटीने ५ जुलै १६८७ रोजी प्रकाशित केले.


PHILOSOPHIÆ NATURALIS PRINCIPIA MATHEMATICA

Autore JS. NEWTON, Trin. Coll. Cantab. Soc. Matheseos Professore Lucasiano, & Societatis Regalis Sodali.


IMPRIMATUR. S. PEPYS, Reg. Soc. PRÆSES. Julii 5. 1686.

LONDINI, Jussu Societatis Regiæ ac Typis Josephi Streater. Prostat apud plures Bibliopolas. Anno MDCLXXXVII.

न्यूटनचे प्रसिद्ध पुस्तक

१६६७ साली जेव्हा ट्रिनिटी कॉलेज सुरू झाले तेव्हा आयझॅक न्यूटन एक संशोधक म्हणून परत आला. त्याच्या कामाचा गौरव करण्यासाठी ट्रिनिटी कॉलेजने त्याला सभासदत्व (Fellow of Trinity College) बहाल केले. पुढच्या दोन वर्षांत त्याने स्नातकोत्तर शिक्षण पूर्ण करून १६६९ मध्ये केंब्रिज विद्यापीठाची एम. ए. ही पदवी प्राप्त केली. त्यांना शिकवायला आयझॅक बॅरो (Isaac Barrow) नावाचे एक प्राध्यापक होते. आयझॅक न्यूटनच्या बुद्धीमत्तेने ते फारच प्रभावित झाले होते. आपल्या विद्यार्थ्याने आपल्याच महाविद्यालयात अध्यापनाचे काम करावे अशी त्यांची इच्छा होती. हे काम सुकर व्हावे यासाठी त्याने आपल्या पदाचा राजीनामा देऊन पद रिक्त केले. १६६९ साली न्यूटनची ल्युकॅशियन प्रोफेसर ऑफ मॅथेमॅटिक्स (Lucasian Professor of Mathematics) या पदावर रीतसर नेमणूक झाली. पुढची दोन दशके त्याने अध्यापनाचे काम इमानेइतबारे केले.

भौतिक शास्त्रातील प्रकाश हा घटक शिकविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली होती. त्या वेळेस या विषयात फारसे काम झालेले नव्हते. दूर असलेल्या ग्रहांचे निरीक्षण करण्यासाठी त्यावेळी एक दूरदर्शी (Telescope) उपलब्ध होती. त्यामध्ये बहिर्वक्र भिंगाचा वापर करीत असत. त्या दूरदर्शीतून दिसणाऱ्या प्रतिमा अस्पष्ट दिसत असत. ही समस्या दूर करण्यासाठी त्याने आरसा वापरून दूरदर्शी बनविली. त्याचबरोबर त्याने एक लोलक (Prism) मिळविला. या लोलकांतून पांढरा प्रकाश पाठविला की त्याचे सात रंगात विभाजन होते असे त्याच्या लक्षात आले. विज्ञानाच्या क्षेत्रात हा एक क्रांतीकारक शोध होता. हे सगळे संशोधन त्याने पुस्तकरूपात १७०४ साली प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाचे नाव ऑप्टिक्स (Opticks) असे होते.



प्रकाशाचे सात रंगात विभाजन

एक उत्कृष्ट संशोधक म्हणून आयझॅक न्यूटनचे नाव सर्वत्र झाले. परंतु न्यूटनला मात्र निराशेने ग्रासले. आपल्या विद्वत्तेचे इथे काही चीज होत नाही असे त्यांचे मत झाले. त्यामुळे ट्रिनिटी कॉलेजची नोकरी सोडण्याचा त्याने निर्णय घेतला. लवकरच त्याची लंडनच्या टांकसाळीचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली. आपल्या विद्वत्तेच्या जोरावर तिथे देखील त्याने महत्त्वाचे बदल घडवून आणले. २० मार्च १७२७ रोजी वयाच्या ८५ वर्षी त्याने आपल्या राहत्या घरी शेवटचा श्वास घेतला. वेस्टमिन्स्टर ॲबे या महत्त्वाच्या दफनभूमीत त्यांना पुरण्यात आले आहे. त्यांचा सन्मान करण्यासाठी ब्रिटनच्या राणीने त्यांना 'सर' ही पदवी बहाल केली. लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना सभासद करून घेतले. काही काळ ते या सोसायटीचे अध्यक्ष देखील होते. ज्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये ते शिकवत होते त्या कॉलेजच्या चॅपेलमध्ये त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. तसेच लंडनच्या ब्रिटिश वाचनालयाच्या पुढे न्यूटनचा एक मोठा पुतळा उभारण्यात आला आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दरवर्षी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीचा एक भाग म्हणून केंब्रिज विद्यापीठातील ट्रिनिटी कॉलेज आणि लंडनमधील ब्रिटिश वाचनालय दाखविले जाते. या दोन्ही ठिकाणी असलेले न्यूटनचे पुतळे दाखवून त्याच्या जीवनाबद्दल माहिती दिली जाते. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विचार करता न्यूटनचे जीवन प्रेरणादायी असेच आहे. त्याचबरोबर त्यांचे विज्ञानातील काम देखील मोलाचे आहे. त्याची माहिती सहलीत सहभागी विद्यार्थ्यांना दिली जाते.



ब्रिटिश वाचनालयाच्या समोरील पुतळा

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# पांढरा गुलमोहर

*'पांढरा गुलमोहर' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*

मित्रांनो, दिसण्यात अन् असण्यात कधी कधी खूप मोठे अंतर असल्याचे लक्षात येते. जे वरवर दिसते त्यावरून काही गृहीतके काढून आपण मोकळे होतो. झाडांच्या बाबतीत देखील बरेचदा असे होते. रस्त्याने जातांना सहज लक्ष जाते ते बाजूला असलेल्या झाडांकडे. आपण काही वेगळ्या कामासाठी निघालेलो असतो. केवळ ढोबळमानाने काही निष्कर्ष काढून आपण पुढे जातो. अन् कधीतरी लक्षात येते, अरेऽऽ हे काहीतरी वेगळे आहे! विदर्भात फिरतांना वरोऱ्याजवळील त्या रस्त्याने मी अनेकदा गेलो होतो. एका शाळेच्या पटांगणाभोवती असलेली ही झाडं मी आधीही पाहिली होती. पण गुलामोहर असावेत असे गृहीत धरून पुढे गेलो होतो. परंतु मागील एप्रिलमध्ये पुनः त्याच रस्त्याने जाताना जरा थबकलोच. शाळेच्या परिसरातील झाडे पांढऱ्या–पिवळ्या फुलांनी बहरली होती. म्हणजे मी गृहीत धरलेली झाडे गुलमोहराची नव्हती तर ! मी थांबून शाळेच्या दिशेने चालू लागलो.



ती झाडे मुख्य रस्त्यापासून जरा दूर होती व आतापर्यंत ती कुठल्यातरी वाहनातून जाता–येतांनाच ओझरती पाहिली होती.

जवळ जाताच लक्षात आले की तो पांढरा गुलमोहर होता. शाळेच्या परिसरातील सर्वच गुलमोहरांची झाडे छान बहरली होती. झाडांखाली पिवळसर पाकळ्यांचा गालीचा अंथरला होता. पांढरा गुलमोहर हे एक मध्यम उंचीचे झाड आहे. साधारण ८ ते १० मीटर उंच वाढणारे व घुमटाकार गर्द हिरव्या व गुलमोहराच्या तुलनेत जास्त दाट असणारा पानांचा पसारा. पाने संयुक्त २० ते ३० सें. मी. लांबीची. पर्णीक गुलमोहरांच्या पर्णिका सारख्याच व १ ते १.५ सें. मी. लांब १० ते १४ पर्णिकांच्या जोड्या एका पानात. पानांनी फांद्याच्या टोकाशी गर्दी केलेली असते. त्यामुळे फांद्या काहीशा जमिनीकडे वाकलेल्या. झाडाचे खोड खडबडीत व काळसर. लाकूड मऊ सहज मोडणारे. त्यामुळे वादळवाऱ्यात या झाडांची बरीच

मोडतोड होते. मुळांचा पसारा फारसा नसल्याने त्यांचे वादळवाऱ्यामुळे उन्मळून पडणे देखील नेहमीचेच. उन्मळून पडले तरी पुनः आधार देऊन उभे केल्यास व थोडी काळजी घेतल्यास झाड जगण्याचे प्रमाण देखील बऱ्यापैकी आहे.

याची फुले आकाराने व रचनेनुसार गुलमोहराच्या फुलांशी साम्य असणारी असतात. पाच पाकळ्यांपैकी खाली वाकलेली एक पाकळी इतरांपेक्षा मोठी, झालरयुक्त व काठ मागे वळलेले. या पाकळ्या फुलाच्या मध्याकडे निमुळत्या होत गेलेल्या. रंग शुभ्र पांढरा. हळूहळू पिवळसर बदामी रंगाकडे वाटचाल. त्यामुळे एकाच झाडावर पांढरी व पिवळसर बदामी रंगाची अशी दोन्ही प्रकारची फुले दिसतात. या फुलांच्या मध्यातून निघणारा हिरव्या रंगाचा व टोकाकडे निमुळता होत गेलेला स्त्रीकेसर व त्याभोवती असणारे ८ ते १० साधारण ४ ते ५ सें.मी. लांबी असणारे डोक्यावर टोच्या असणारे लालसर रंगाचे पुंकेसर यामुळे फुलाच्या सौंदर्यात आणखीच भर पडते. फुलांचा हंगाम मार्च ते मे पर्यंत चालू असतो. त्यानंतर यावर १५ ते २० सें.मी. लांबीच्या चपट्या हिरव्या शेंगा दिसू लागतात. या शेंगा हळूहळू तपकिरी होत जातात. या बरेच दिवस झाडावर असतात. पावसाला सुरुवात झाल्यानंतर हळूहळू गळून पडतात.

या झाडाची पाने तथा सालीचा उपयोग हा सांधे निखळल्यामुळे वा अन्य कारणांनी सांध्यांमध्ये होणाऱ्या वेदनांवर उपाय म्हणून वापरतात. आयुर्वेदामध्ये याचा फारसा उल्लेख नाही. तथापि काही ग्रंथात सिद्देश्वर या संस्कृत नावाने याचा उल्लेख आढळतो. काही भागांत पारंपारिक उपचार पद्धतीत घरगुती उपचार म्हणून उपयोग होतो. तथापि यावर अधिक संशोधन चालू आहे. या झाडाचे शास्त्रीय नाव Delonix elata असे असून इंग्रजीत Peacock flower, Tiger bean, Flamboyant tree इत्यादी नावे आहेत. तथापि White Gulmohar याच नावाने हे जास्त परिचित आहे.

या झाडाची लागवड बीयांपासून करता येते. तसेच याची अंगठ्या एवढी जाडीची फांदी तोडून जमिनीत रोवली तरी काही दिवसांतच नवीन पालवी फुटल्याचे दिसून येते. सुरुवातीस एक वर्ष थोडी काळजी घेतली की मग फारशी काळजी घेण्याची गरज नाही. मात्र वादळवाऱ्यात टिकून राहण्याची क्षमता नसल्याने फुलांचा बहर संपला की फांद्यांची संख्या कमी केल्यास झाड कोसळण्याचा धोका नाही. नवीन फांद्या लवकरच येत असल्याने झाड काही महिन्यातच हिरवेगार दिसू लागेल व पुनः फुलांनी बहरेल. असा हा एक सुंदर व वेगळा वृक्ष आहे.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

●●●



महान माणसांची माने साधी असतात.

# कोरोना वायरस परिणाम : चीन संकटात, भारताला संधी !..

अमेरिकेसह अनेक देश चीनला पर्याय म्हणून भारताकडे पहात आहेत. भारतात कुशल मनुष्यबळाची उपलब्धता मुबलक आहे. पण आजवर आपण मागणीच्या शोधात होतो. आज चीन बॅकफूटवर गेल्यामुळे भारताला निर्यात वाढवण्यास मोठा वाव आहे. याचा फायदा घेण्यासाठी शीघ्रगतीने उपाययोजनांची व पावले टाकण्याची गरज आहे.असा विचार मांडणारा ज्येष्ठ परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख : संपादक

करोना विषाणूच्या हाहाकारामुळे चीनचे अर्थकारण पूर्णतः कोलमडून गेले आहे. चीन हे जगाचे मॅन्युफॅक्चरिंग हब असल्यामुळे जगालाही याचा मोठा फटका बसला आहे. कारण पुरवठासाखळी विस्कळीत झाली आहे. त्यातून निर्माण झालेली पोकळी व्यापण्याची सुवर्णसंधी भारताला चालून आली आहे. अमेरिकेसह अनेक देश चीनला पर्याय म्हणून भारताकडे पहात आहेत. भारतात कुशल मनुष्यबळाची उपलब्धता मुबलक आहे. पण आजवर आपण मागणीच्या शोधात होतो. आज चीन बॅकफूटवर गेल्यामुळे भारताला निर्यात वाढवण्यास मोठा वाव आहे. याचा फायदा घेण्यासाठी शीघ्रगतीने उपाययोजनांची व पावले टाकण्याची गरज आहे.

चीनच्या वुहान प्रांतातून उगम पावलेल्या कोरोना विषाणूचा प्रसार जगभरातील १४५ हून अधिक देशांमध्ये झाला आहे. कोविड १९ मुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्याही दिवसागणिक वाढते आहे. या सर्व परिस्थितीचे अत्यंत दूरगामी सामाजिक परिणाम दिसून येत आहेतच; परंतु त्याबरोबरीने याचे अत्यंत गंभीर आर्थिक परिणामही येत्या काही काळात समोर येणार आहेत. विशेषतः चीनमधील आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. जागतिक महासत्ता बनू पाहणाऱ्या देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. मागील काळात सार्स नावाच्या विषाणूचा असाच प्रसार झाला होता. त्यावेळी जगाच्या जीडीपीत चीनचा वाटा होता ८ टक्के. परंतु आज कोरोना विषाणूचा प्रसार होत असताना चीनचा जागतिक जीडीपीतील वाटा २० टक्के आहे. चीन हा जगातील पुरवठा साखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. चीनची निर्यात अब्जावधी डॉलर्सची आहे. एकट्या अमेरिकेबरोबर चीनचा ७०० अब्ज डॉलर्सचा व्यापार आहे. जपानबरोबरचा चीनचा व्यापार ४५० डॉलर्सचा आहे. संपूर्ण जगाला कच्चा माल पुरवणारा कारखाना म्हणून चीनकडे पाहिले जाते. बहुतांश अमेरिका आणि युरोपियन देश हे चीनकडूनच कच्चा माल घेतात. परंतु आज चीनमधील ५० टक्क्यांहून जास्त उद्योगधंदे बंद पडले आहेत. चीनकडून होणारी निर्यात २० टक्क्यांहून अधिक प्रमाणात कमी झाली आहे. चीन सरकारने कोरोनावर नियंत्रण मिळवण्यात यश आले असल्याचे घोषित केले असले तरी तेथील बंद झालेले उद्योग, कारखाने सुरू होण्यासाठी, पूर्ववत होण्यासाठी पुढील सहा महिन्यांचा अवधी लागणार आहे. आजघडीला चीनमधील केवळ २५ टक्के उद्योग उघडण्याच्या मार्गावर आहेत. यात लोक पुन्हा कामावर जाण्याच्या विचारात आहेत. चीनमधील कोळशाची पत ७५ टक्क्यांनी घटली आहे. त्यामुळे उद्योग ठप्प झाले आहेत. असेच म्हणावे लागेल. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने अलीकडेच अंतराळातील काही छायाचित्रे घेतली आहेत. त्यामध्ये चीनमधील प्रदूषण झपाट्याने कमी झाल्याचे दिसून आले. यामागचे कारण म्हणजे चीनमध्ये सुमारे ५० लाख उद्योगधंदे बंद पडले आहेत. परिणामी त्यातून होणारे कार्बन उत्सर्जनही बंद झाले आहे.

आज जगभरातील विविध देशांमध्ये असंख्य प्रकारच्या पक्क्या वस्तू निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारा कच्चा माल चीनकडून निर्यात केला जातो. यामध्ये वाहनाचे सुटे भाग, रसायने, सिरॅमिक्स, रबर, कपडे, तसेच कार्बन यांचा समावेश होतो. पण गेल्या महिन्याभरापासून हा पुरवठा बंद झाला आहे. तत्पूर्वी जवळपास दोन वर्षे अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापारयुद्ध सुरू होते. त्याकाळात अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी चीनला पर्याय शोधायला सुरुवात केली होती. एवढेच नव्हे तर चीनला बाजूला सारण्याचा प्रयत्न केला होता ! अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी चीनमधून आपले उद्योग गुंडाळायला सुरुवात केली. उदाहरणच घ्यायचे तर मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स जगतातील दिग्गज कंपनी असणाऱ्या सॅमसंग या कंपनीचे ५० टक्के मोबाईल चीनमध्ये उत्पादित होत असत. पण त्यांनी ते युनिट बंद केले असून उत्तर प्रदेशातील नोएडा येथे हे युनिट उभारण्याचा निर्णय झाला आहे. अशाच प्रकारे आता अन्य अनेक कंपन्याही कच्च्या मालासाठी पर्यायांचा शोध घेत आहेत.

या शोधप्रक्रियेदरम्यान त्यांचे प्रामुख्याने लक्ष भारताकडे आहे. गेल्या एक महिन्यात घडलेल्या घडामोडींमुळे हे सिद्धही होते. सिरॅमिक्स, रबर, रसायने, गाड्या, कपडे आणि दागिने यांसारख्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये युरोपियन देश, अमेरिका यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर भारताकडे पुरवठ्याविषयी चौकशी केली जात आहे. १०० कोटींपेक्षा अधिक रकमेच्या कराराविषयी चौकशी सुरू आहे. मलेशियासारख्या देशाने भारताला कोरोना विषाणूविरोधात ५० लाख मास्क निर्मितीचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. परंतु सीएए आणि एनआरसी विरोधी भूमिका घेतल्यामुळे आणि पाकिस्तानची तळी उचलल्यामुळे भारताने मलेशियाला आपण निर्यात थांबवली आहे. तरीही मलेशियाने मागणी कायम ठेवली आहे. सांगण्याचा मुद्दा इतकाच की, आज संपूर्ण जग चीनचा पर्याय म्हणून भारताकडे पाहात आहे. अमेरिकेनेही चीनवरील त्यांचे अवलंबित्व कमी करत आणले आहे. २०१८–२०१९ मध्ये ही गोष्ट स्पष्टपणाने दिसून आली आहे. या वर्षात भारताने चीनला मागे टाकून भारत हा अमेरिकेचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार झाला. २०१८–२०१९ मध्ये भारत आणि अमेरिकेदरम्यानचा व्यापार सुमारे ८७.९५ अब्ज डॉलरचा होता. त्याचवर्षी चीन आणि भारत यांच्यातील व्यापार ८७.०५ अब्ज डॉलर्स इतका होता. यावरून अमेरिकाही भारताकडून वस्तूंची निर्यात करण्यास उत्सुक असल्याचे दिसते.

भारताने या संधीचा फायदा नेमका कसा घ्यायचा याचा विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने काही पावले आपण उचलायला सुरुवात केली आहे. भारतात सुमारे ५७ अब्ज डॉलरच्या चिनी वस्तू बाजारात विकायला येतात. यामध्ये सर्वांत महत्त्वाचा पुरवठा होतो तो भारतात तयार होणाऱ्या औषधांसाठीच्या कच्चा मालाचा. भारतात जी प्रतिजैविके बनवली जातात त्याचा कच्चा माल चीनकडून येत असतो. भारत त्याबाबत चीनवर अवलंबून होता. हे अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने २ अब्ज डॉलरची योजना तयार केली आहे. आजवर चीनबरोबर आपण स्पर्धा करू शकत नव्हतो; कारण चीन उत्पादनात महाअग्रेसर आहे. चीनचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि प्रचंड सवलती यांमुळे भारतातील स्थानिक उद्योगांना चीनी मालाशी स्पर्धा करता आली नाही. परंतु कोरोनाच्या साथीने त्रस्त चीनमधून या वस्तू येणे बंद होईल तेव्हा स्थानिक उद्योगांना चालना मिळेल. ह्याचा फायदा घेणे आवश्यक आहे. भारताला याबाबत सजग राऊन प्रत्यक्ष कार्यरत राहाणे गरजेचे आहे. यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्या लागतील. उत्पादन साखळीतील एक भाग होण्याची ही सुसंधी दवडता कामा नये. भारत पुढाकार

घेऊ शकला नाही तर याचा फायदा दक्षिणपूर्व आशियाई देश घेऊ शकतात. विशेषतः कंबोडिया, व्हिएतनाम तसेच मलेशिया हे देश रबर, रसायने यांच्या उत्पादनात भारताला मागे टाकू शकतात आणि तेच अमेरिका आणि युरोप या देशांना पुरवठा सुरू करतील. म्हणजेच चीनमुळे कच्च्या मालाची विस्कळीत झालेली साखळी पूर्ववत करण्याचे काम कंबोडिया, व्हिएतनाम, मलेशिया यांसारखे देश भरून काढू शकतात. त्यामुळे भारताने गाफिल राहून चालणार नाही. भारताला कच्चा माल पुरवण्याच्या ज्या नव्या संधी येत आहेत त्या स्वीकारून, आपला फायदा करून घेणे हे गरजेचे आहे.

जागतिक निर्यातीत भारताचा वाटा २ टक्के असला पाहिजे असे उद्दीष्ट ठेवले आहे. सद्यस्थितीत भारताची निर्यात १ टक्क्यांपेक्षा कमी आहे. ती वाढवण्याची उत्तम संधी आता उपलब्ध झाली आहे. त्यासाठी आपल्या देशातील निर्यातदारांना योग्य आणि कमी व्याजदरांमध्ये कर्जपुरवठा कसा करता येईल या दृष्टीकोनातून भारताने त्वरीत पावले उचलली पाहिजेत. याखेरीज निर्यातदारांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रसंगी निर्यातानुदान देण्याची गरज आहे. भारतात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. याचा फायदा घेत देशात गारमेंट इंडस्ट्रीची वाढ कशी होईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच आज आपण इलेक्ट्रॉनिक्स आणि हार्डवेअरही आयात करत असतो. या सर्वांचे उत्पादन आता भारतात सुरूकरण्याची वेळ आली आहे. सेमी कंडक्टरच्या क्षेत्रात भारताची एकेकाळी दादागिरी होती. पण आज आपण ते चीनकडून आयात करतो आणि वापरतो. तसे न करता या क्षेत्राला पुन्हा चालना दिली गेली पाहिजे. या प्रयत्नांमुळे ‘मेक इन इंडिया’, स्किल इंडिया या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी मोहिमांना नवी भरारी मिळू शकणार आहे.

इझ ऑफ डुईंग बिझनेसमध्ये भारत आपला क्रमांक वरच्या स्थानी आणण्याचा प्रयत्न करत आहे. यासाठी प्रयत्नांची आणि उपाययोजनांची शिकस्त केल्यास भारताला २ टक्के निर्यातीचे उद्दीष्ट गाठणे शक्य होऊ शकेल. त्यातून भारत जागतिक उत्पादन साखळीचा भाग बनू शकेल. यासाठीची संधी दाराशी उभी आहे.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# शीतयुद्ध (Cold War)

*दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये सुरू झालेल्या शीतयुद्धाविषयी माहिती देणारा लेख- संपादक*

१९३९ ते १९४५ या कालावधीत जगात दुसरे महायुद्ध सुरूहोते. हे एक जागतिक युद्ध होते. कारण या युद्धात संपूर्ण जग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी झाले होते वा ओढले गेले होते. दुसरे महायुद्ध हे मानवी इतिहासातील सर्वात विध्वंसक युद्ध समजले जाते. हे युद्ध दोन गटांमधील देशांमध्ये लढले गेले. हे दोन गट म्हणजे मित्र राष्ट्रांचा गट (इंग्रजीत या गटाला Allied Powers असे संबोधले गेले) व अक्ष राष्ट्रांचा गट (या गटाला इंग्रजीत Axis Powers असे म्हणतात) हे गट होते. मित्रराष्ट्र राष्ट्रांच्या गटामध्ये इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, सोव्हिएत संघ, चीन व त्यांच्या मित्र राष्ट्रांचा समावेश होता. अक्ष राष्ट्रे म्हणजे प्रामुख्याने जर्मनी, इटली व जपान ही राष्ट्रे होती.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिका (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) व सोव्हिएत संघ ही राष्ट्रे एकत्रितरित्या त्यांच्या समान शत्रूविरुद्ध म्हणजेच अक्ष राष्ट्रांविरोधात लढत होती. त्यामुळे या दोन राष्ट्रांमध्ये युद्धकालात सहकार्य, सामंजस्य व मित्रत्वाची भावना होती. परंतु दुसरे महायुद्ध संपल्यानंतर या दोन बड्या राष्ट्रांमध्ये एकमेकांविषयी अविश्वासाची व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. वैचारिक वाद विकोपाला गेले व मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत संघ या देशांच्या दरम्यान निर्माण झालेल्या या तणावाला व स्पर्धेला अभ्यासकांनी व तज्ज्ञांनी 'शीत युद्ध' (Cold War) म्हणून संबोधले वा नाव दिले.

### शीतयुद्धाचा अर्थ

साध्या व सरळ शब्दात दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशांच्या दरम्यान असलेली 'तणावपूर्ण स्थिती' म्हणजे शीत युद्ध होय असे म्हणण्यास हरकत नाही. अशी राष्ट्रं एकमेकांचा विरोध करत असतात व एकमेकांविरोधात भूमिका घेताना आढळतात. तसेच या राष्ट्रांमध्ये मैत्रिचा अभाव असतो व तणावपूर्ण संबंध असतात; त्याचप्रमाणे त्यांच्यात वैचारिक व सैद्धांतिक वाददेखील असतात. अशा राष्ट्रांमध्ये एकमेकांविषयी शत्रूत्वाची भावना असते.

तज्ज्ञांनी व इतिहासकारांनी दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये सुरू झालेल्या जीवघेण्या स्पर्धेला व तणावाला 'शीतयुद्ध' असे नाव देणे पसंत केले. अमेरिका व सोव्हिएत संघ या देशांदरम्यानची ही स्पर्धा वा शीत युद्धाची सुरुवात दुसरे महायुद्ध संपल्यानंतर साधारणतः १९४५ साली सुरू झाली असे म्हणण्यास हरकत नाही व हे शीत युद्ध १९९१ साली सोव्हिएत संघात साम्यवादाचा पाडाव व त्या देशाचे विघटन होईपर्यंत सुरू होते.

अभ्यासकांच्या मते प्रसिद्ध ब्रिटिश लेखक जॉर्ज ऑर्वेल-George Orwell यांनी शीतयुद्ध (मूळ नाव एरिक ऑर्थर ब्लेअर- Eric Arthur Blair, जन्म- २५ जून १९०३, मोतीहारी, बंगाल प्रांत, ब्रिटिशकालीन भारत व मृत्यू- २१ जानेवारी १९५० लंडन, इंग्लंड) १९४५ साली पहिल्यांदा वापरला. १९ ऑक्टोबर १९४५ रोजी 'ट्रिब्यून' (Tribune) या नियतकालिकात प्रसिद्ध

झालेल्या आपल्या 'यू अँड द ॲटम बॉंब' (You and the Atom Bomb) या निबंधात वा लेखात म्हटले होते की, भविष्यात जगातील महासत्ता म्हणवून घेणारे प्रबळ देश एकमेकांविरोधात अतिशय संहारक अशा अण्वस्त्रांचा वापर करतील व त्यामुळे क्षणार्धात कोट्यांवधी लोक मृत्युमुखी पडतील. हा लेख लिहिताना जॉर्ज ऑर्वेल यांच्या डोळ्यासमोर अमेरिका व सोव्हिएत संघ या तत्कालीन दोन महासत्ता व त्यांच्यातील असलेले वैचारिक मतभेद होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. जॉर्ज ऑर्वेल यांनी विपुल प्रमाणात लिखाण केले. 'एनिमल फार्म' (Animal Farm) व 'नायन्टीन एटी फोर' (Nineteen Eighty Four) ह्या त्यांच्या अतिशय गाजलेल्या कादंबऱ्या समजल्या जातात. एनिमल फार्म ही कादंबरी म्हणजे स्टॅलिनच्या शैलीतील साम्यवादावरील व्यंग वा उपहासात्मक भाष्य समजले जाते.

असे म्हटले जाते की, अमेरिकेत बर्नार्ड बरूच (Bernard Baruch) यांनी शीतयुद्ध हा शब्द १९४७ साली अमेरिकेतील साऊथ कॅरोलीना (South Carolina) या राज्यात असताना पहिल्यांदा वापरला. बर्नार्ड बरूच यांचा जन्म १९ ऑगस्ट १८७० रोजी साऊथ कॅरोलीना या राज्यातील केरशॉ (Kershaw) या परगण्यातील कॅम्डेन (Camden) या शहरात झाला. त्यांचे उच्चशिक्षण न्यू यॉर्क या शहरातील सिटी कॉलेज ऑफ न्यू यॉर्क (City College of New York) या महाविद्यालयातून झाले. त्यांनी १८८९ साली पदवी प्राप्त केली. त्यांनी रोखे बाजारात गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणात धनसंपत्ती प्राप्त केली होती. अर्थपुरवठा वा भांडवल पुरवठा करणे हा त्यांचा व्यवसाय होता. त्यांनी वुड्रो विल्सन व फ्रँकलीन डिलानो रूझवेल्ट या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे सल्लागार म्हणून देखील काम पाहिले होते.

तसे पाहता शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोव्हिएत संघ यांच्यात प्रत्यक्ष युद्ध झाले नाही; परंतु ते आपापल्या गटातील राष्ट्रांना ते आपल्या विरोधी गटातील राष्ट्रांसोबत करत असलेल्या युद्धात सर्वोतोपरी मदत करत असत. त्यामुळे शीतयुद्धाचे वर्णन युद्ध नसलेली शांतता वा तणावपूर्ण शांतता असे करता येईल.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे १९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यानंतर शीतयुद्धाची सुरुवात झाली व ते १९९१ पर्यंत चालू होते.

### शीतयुद्धाची कारणे

आपण पाहिलेच आहे की, दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिका व सोव्हिएत संघ जोडीने अक्ष राष्ट्रांविरोधात व प्रामुख्याने त्यांचा समान शत्रू असलेल्या हिटलरच्या जर्मनीविरोधात लढत होते. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर या दोन राष्ट्रांमधील संबंध बिघडत गेले व त्याचे रूपांतर शीतयुद्धात झाले.

शीतयुद्धास कारणीभूत घटक वा कारणे खालीलप्रमाणे मांडता येतील :

शीतयुद्धाची कारणमीमांसा करताना आपणास रशियात १९१७ साली ऑक्टोबर महिन्यात झालेल्या बोल्शेविक क्रांतीपर्यंत मागे जावे लागते. ही क्रांती ब्लादीमीर लेनिन या बुद्धीवादी व अभ्यासू नेत्याच्या नेतृत्वाखाली झाली होती. या क्रांतीला रशियातील साम्यवादी क्रांती असेदेखील म्हटले जाते. याचे कारण असे की, लेनिनवर १९ व्या शतकातील जर्मन तत्त्ववेत्ता कार्ल मार्क्स याच्या साम्यवादी तत्त्वज्ञानाचा जबरदस्त पगडा होता. कार्ल मार्क्सने आपले साम्यवाद विषयक विचार आपल्या 'दास कॅपिटल' या अतिशय प्रसिद्ध व गाजलेल्या ग्रंथात मांडले होते. जगभरातील साम्यवाद्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. तज्ज्ञमंडळी या ग्रंथाचे वर्णन 'इतिहासाचा आर्थिक दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावणारा ग्रंथ' असे करतात.

कार्ल मार्क्सच्या मते समाजात वेगवेगळ्या स्वरूपात सदैव 'आहे रे' (एकप्रकारे उच्चभ्रू व आर्थिकदृष्ट्या सधन असणारा वर्ग) व 'नाही रे' (एकप्रकारे निम्न व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणारा वर्ग) हे दोन वर्ग असतात व या दोन वर्गांमध्ये सतत तंटा चालू असतो.

श्रीमंत व आर्थिकदृष्ट्या प्रबळ असणाऱ्या भांडवलदाररूपी 'आहे रे' वर्गाचे उत्पादन साहित्यांवर वा साधनांवर नियंत्रण असते. याउलट आपल्या श्रमाने विविध वस्तू बनवणाऱ्या वा उत्पादन करणा-या व खऱ्या अर्थाने संपत्ती निर्माण करणाऱ्या वर्गाचे म्हणजेच 'नाही रे' वर्गाचे प्रतिनिधित्व कामगार वर्ग करतो असे कार्ल मार्क्सचा साम्यवाद म्हणतो.

परंतु मार्क्सच्या सिद्धांतानुसार 'नाही रे' वर्गाने म्हणजेच कामगारांनी निर्माण केलेल्या संपत्तीचा मोठा हिस्सा वा भाग हा भांडवलदार रूपी 'आहे रे' वर्ग गिळंकृत करतो व हेच 'नाही रे' वर्गाच्या दुःखांचे व खालावलेल्या आर्थिक स्थितीचे तसेच दयनीय स्थितीचे कारण आहे. यावरून असा अन्वयार्थ निघतो की, समाजात तुलनेने 'नाही रे' वर्गाची संख्या जास्त असते व या वर्गाचे अल्पसंख्याक वा तुलनेत संख्येने कमी असणारा 'आहे रे' वर्ग आर्थिक व त्या अनुषंगाने सामाजिक शोषण करत असतो. मार्क्सच्या या नाविन्यपूर्ण तत्त्वज्ञानाने व त्याने इतिहासाचे जे आर्थिक दृष्टीकोनातून विश्लेषण केले त्याने जगभरातील विविध देशांतील तरुणांवर भुरळ घातली. मार्क्सवादाने प्रचंड प्रमाणात प्रभावीत झालेला असाच एक बुद्धिमान तरुण म्हणजे ब्लादीमीर ईलीयच उलयानोव ऊर्फ लेनिन हा होता. फेब्रुवारी १९१७ च्या क्रांतीने रशियातील झारच्या (रशियन भाषेत झार म्हणजे राजा वा सम्राट होय) राजवटीला मूठमाती दिली. याचाच अर्थ असा की, या क्रांतीमुळे रशियावर राज्य करणाऱ्या रोमानोव राजघराण्यातील दुसरा निकोलस याला राज्यकारभार सोडून देऊन राजगादीवरून पायउतार व्हावे लागले. दुसरा निकोलस हा रोमानोव राजघराण्यातील रशियावर राज्य करणारा शेवटचा सम्राट ठरला. फेब्रुवारी महिन्यातील १९१७ च्या क्रांतीनंतर रशियात अलेक्झांडर केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील अंतरिम वा हंगामी सरकारची स्थापना झाली. ऑक्टोबर १९१७ मध्ये रशियात दुसरी क्रांती झाली व या क्रांतीला बोल्शेविक क्रांती वा 'लाल क्रांती' असे संबोधले गेले. या क्रांतीनंतर लेनिन रशियात सत्तेवर आला व त्याने रशियात मार्क्सच्या साम्यवादी तत्त्वज्ञानावर आधारित असलेले जगातील पहिले साम्यवादी सरकार स्थापन केले.

अशातऱ्हेने रशियात लेनिनने साम्यवादी सरकारची स्थापना केली. मात्र त्याच्या साम्यवादी सरकारला विरोध करणारा एक मोठा वर्ग रशियात होता. लेनिन व साम्यवादाला विरोध करणाऱ्या या वर्गाला 'श्वेत' वा 'पांढरे' असे संबोधले गेले, तर लेनिन व त्याच्या साम्यवादी समर्थकांना 'लाल' असे संबोधले गेले. कारण साम्यवाद्यांचा प्रतिकात्मक रंग लाल असतो. रशियात बोल्शेविक क्रांती झाल्यानंतर लेनिनचे साम्यवादी सरकार व त्याचे 'लाल' समर्थक यांच्यात व त्याचे विरोधक 'श्वेत' यांच्यात यादवी युद्धाला सुरुवात झाली. श्वेतांना लेनिनचे साम्यवादी 'लाल' सरकार नको होते म्हणून त्यांनी बंड केले व रशियात 'लाल' व 'श्वेतांमधील' यादवी युद्धाला सुरुवात झाली. 'श्वेतांना' लेनिनचे साम्यवादी सरकार उलथवून टाकायचे होते, तर 'लाल' मडळींना लेनिनच्या सरकारचे रक्षण करायचे होते व हे दोन्ही गट आपापल्या उद्देशपूर्तीसाठी एकमेकांविरुद्ध त्वेषाने लढत होते. रशियातील या यादवी युद्धात इंग्लंड, फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, चीन व अमेरिकेसारख्या मित्रराष्ट्रांनी 'श्वेतांना' पाठिंबा दिला. एवढेच नव्हे तर, मित्रराष्ट्रांनी 'श्वेतांना' लष्करी मदत केल्याचे देखील निदर्शनास येते. शेवटी १९२३ साली रशियातील लेनिनच्या

साम्यवादी सरकारला 'श्वेतांचा' बंदोबस्त करण्यात व त्यांचा पराभव करण्यात यश आले व हे यादवी युद्ध संपले. अशाप्रकारे अखेर लेनिनचे साम्यवादी सरकार रशियात टिकले. अभ्यासकांच्या मते इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, इ. मित्रराष्ट्रांनी या यादवी युद्धात 'श्वेतांना' रशियातील साम्यवादी सरकारविरोधात दिलेल्या सक्रिय मदतीमुळे रशियातील साम्यवादी नेतेमंडळींच्या मनात या राष्ट्रांविषयी तेढ निर्माण झाली व त्यांचा या राष्ट्रांवरील विश्वास उडाला. तसेच ही राष्ट्रे भविष्यात देखील रशियातील साम्यवादी सरकार पाडू शकतील या शंकेने त्यांच्या मनात पक्के घर केले. अशाच एका नेत्यांपैकी मार्शल जोसेफ स्टॅलिन एक होता. या पार्श्वभूमीवर स्टॅलिनने दुसरे महायुद्ध संपल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात आक्रमक भूमिका घेतली व अमेरिकेने त्याला उत्तर देण्यास सुरुवात केल्यावर शीतयुद्धाचा प्रारंभ झाला. तत्पूर्वी पहिल्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या राष्ट्रसंघात रशियाला सदस्यत्व देण्यात आले नव्हते.

अमेरिकेच्या नेतृत्वाखालील लोकशाहीवादी राष्ट्रे व सोव्हिएत संघ यांच्यात निश्चितपणे वैचारिक वाद व मतभेद होते यात वाद नाही. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या राष्ट्रांचा लोकशाही शासनप्रणाली मध्ये विश्वास होता. लोकशाहीत सामान्य नागरिकांना निवडणूक व मतदानाच्या अधिकाराच्या माध्यमातून स्वत:चे सरकार निवडण्याचा अधिकार असतो. एवढेच नव्हे तर लोकशाहीत लोकांना विचार स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य असते. तसेच ते सरकारवर उघडपणे टीका करू शकतात व सरकारला धारेवर धरून विविध विषयांवर जाब विचारू शकतात, नव्हे तो त्यांचा अधिकार असतो. परंतु सोव्हिएत संघात तेथील साम्यवादी पक्षाची हुकूमशाही स्वरूपाची राजवट होती. येथे सामान्य नागरिकांना लोकशाहीतील सर्व अधिकार नाकारलेले होते. येथे लोकांना कुठल्याही प्रकारचे व्यक्तीस्वातंत्र्य नव्हते. अशाप्रकारे अमेरिका व तिच्या मित्रराष्ट्रांत लोकशाही तर सोव्हिएत संघात अगदी याच्या विरुद्ध साम्यवादी हुकूमशाही होती व हा या दोन गटांतील फार मोठा वैचारिक मतभेद व वाद होता. हा राजकीय भेदच दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत संघा दरम्यान शीतयुद्ध सुरू होण्यास कारणीभूत ठरले.

अमेरिका व तिचे पाश्चिमात्य मित्र (प्रामुख्याने पश्चिम युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स, तसेच कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इ. देश) भांडवलशाहीत विश्वास ठेवणारे होते. भांडवलशाहीत भांडवलदार वा खाजगी उद्योजक हे अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात, नव्हे एक प्रकारे अर्थ व्यवस्थेवर त्यांचेच नियंत्रण असते. उद्योजक व भाडंवलदार विविध संसाधनांचा वापर करून वेगवेगळ्या वस्तुंचे उत्पादन करत असतात. अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेत सरकारने देशाच्या आर्थिक बाबींमध्ये हस्तक्षेप करणे अपेक्षित नसते. येथे सरकारने भांडवलदारांना सर्व सुविधा उपलब्ध करून देणे व वेळ पडल्यास योग्य ते मार्गदर्शन करणे अपेक्षित असते. परंतु या व्यतिरिक्त देशाच्या कुठल्याही आर्थिक व उत्पादनाच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणे अपेक्षित नसते.बाजारी वा अर्थशास्त्रीय सिद्धांतांनुसार अर्थव्यवस्थेला कार्यरत राहू द्यावे या तत्त्वात भांडवलशाही व्यवस्था विश्वास ठेवते. तसेच या देशांमध्ये व्यक्तीच्या आर्थिक विकासाला महत्त्व दिलेले आढळते. मात्र, सोव्हिएत संघात नेमकी याच्या उलट असणारी अर्थव्यवस्था होती. येथे आर्थिक विकासाचा फायदा संपूर्ण समाजाला झाला पाहिजे ही धारणा होती. तसेच संपूर्ण समाजाची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी सरकारला अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करण्याची मुभा होती, नव्हे संपूर्ण अर्थव्यवस्थेवरच साम्यवादी सरकारचे नियंत्रण होते. त्यामुळे सोव्हिएत संघात एकप्रकारे देशातील सर्व शेतजमिनीचा व उद्योगधंद्यांचा ताबा तेथील साम्यवादी सरकारकडे होता.

दुसऱ्या महायुद्धात मित्र राष्ट्रांनी जर्मनीवर दोन बाजूंनी हल्ला केला. पश्चिमेकडून इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेने हल्ला केला; तर पूर्वेकडून सोव्हिएत संघाने आपले सैन्य जर्मनीत घुसवले. अशाप्रकारे जर्मनीकडे सरकत असताना दुसऱ्या महायुद्धादरम्यान पूर्व युरोपातील पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रोमानिया, बल्गेरिया, अल्बेनिया आदी देशांमधून सोव्हिएत संघाचे सैन्य मार्गक्रमण करत होते. हेच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर, जर्मनीपर्यंत पोहोचण्यासाठी सोव्हिएत संघाच्या सैन्याला या देशांतून पुढे जाण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नव्हता. परंतु येथून लाल सैन्य फक्त पुढे गेले नाही तर सोव्हिएत संघाने यातील बऱ्याचशा देशांमध्ये साम्यवादी सरकारांची स्थापना केली. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर या पूर्व युरोपातील देशांना स्वातंत्र्य द्यावे असे अमेरिकेला वाटत होते. परंतु सोव्हिएत संघाने येथे पद्धतशीरपणे साम्यवादी शासन प्रणाली स्थापन केल्यामुळे हे देश सोव्हिएत संघाचे मित्र व त्याही पुढे जाऊन म्हटल्यास पूर्णतः सोव्हिएत संघावर विसंबून राहणारी राष्ट्रे बनली.

असे म्हटले जाते की, अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलीन डिलानो रुझवेल्ट, विन्सटन चर्चिल (ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान) व हॅरी ट्रूमन (हे रुझवेल्टचा १२ एप्रिल १९४५ रोजी मृत्यू झाल्यानंतर तत्कालीन उपराष्ट्राध्यक्ष या नात्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले) अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष यांच्या मनात स्टॅलिनच्या एकंदरच मनसुब्यांबाबत विश्वास नव्हता. या पाश्चिमात्य नेतेमंडळींना वाटत होते की, भांडवलशाही व लोकशाहीच्या विरोधात स्टॅलिनला संपूर्ण जगात साम्यवादाचा प्रसार करावयाचा आहे.

स्टॅलिन दुसरे महायुद्ध सुरू असतानाच अमेरिका व इंग्लंडवर जरा खट्टू वा नाराज होता. याचे कारण म्हणजे स्टॅलीन अमेरिका व इंग्लंडकडे त्यांनी जर्मनीविरुद्ध दुसरी आघाडी उघडावी म्हणजेच जर्मनीवर पश्चिमेकडून हल्ला करावा अशी मागणी वारंवार करत होता. त्यामुळे जर्मनीची लष्करी ताकद पूर्व आघाडी (सोव्हिएत संघाविरुद्ध) व पश्चिम आघाडी (अमेरिका व इंग्लंड) या दोन आघाड्यांवर विभागली गेली असती व सोव्हिएत संघावरील निदान सुरुवातीच्या काळात तरी प्रबळ जर्मनीविरुद्ध लढण्याचा ताण बऱ्याच प्रमाणात कमी झाला असता. परंतु स्टॅलिनची ही मागणी लवकर पूर्ण न झाल्यामुळे सोव्हिएत संघावर युद्धाचा जबरदस्त ताण तर पडलाच, परंतु सोबतच सोव्हिएत संघाचे अनेक सैनिक मृत्युमुखी पडले. याचा स्टॅलिनच्या मनात निश्चितच राग होता.

तज्ज्ञांचे असे मत आहे की, स्टॅलिनला नेहमी वाटत असे की, अमेरिका व तिचे मित्रराष्ट्र भविष्यात सोव्हिएत संघावर हल्ला करून तेथील साम्यवादी सरकार पाडण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे त्याला अमेरिकाप्रणीत अशा संभाव्य आक्रमणापासून एक सुरक्षा कवच हवे होते व ते त्याने पूर्व युरोपातील राष्ट्रांमध्ये सोव्हिएत संघाला बांधील असणाऱ्या साम्यवादी राजवटी स्थापन करून निर्माण केले. याचाच अर्थ असा की, जर भविष्यात आक्रमण झालेच तर अमेरिका व तिच्या मित्रांना पूर्व युरोपातील देश पार करून यावे लागेल व तोपर्यंत सोव्हिएत संघाला युद्ध तयारी करण्यासाठी व योग्य ती युद्धनीती आखण्यासाठी वेळ मिळेल अशी यामागची योजना होती. स्टॅलिन फक्त पूर्व युरोपातच साम्यवादी राजवटी स्थापून थांबला नाही तर त्याने युरोपातील इतर देशांत व जगाच्या इतरही भागांमध्ये साम्यवादी राजवटी स्थापन करण्याचे प्रयत्न चालवले. स्टॅलिनच्या अशा आक्रमक धोरणामुळे अमेरिकेला देखील आक्रमक पावले उचलावी लागली. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रूमन यांनी 'ट्रूमन डॉक्ट्रीन' या धोरणाद्वारे जाहीर केले की, 'अमेरिका स्वातंत्र्याचा व लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या लोकांच्या अधिकारांवर गदा येऊ देणार नाही व त्यांच्या देशात त्यांच्या मर्जीच्या विरोधात निरंकुश

सत्ता असणारी लोकशाहीच्या विरोधातील हुकूमशाही सरकारे स्थापन होऊ देणार नाही, अशा स्वरूपाची घोषणा' केली. हा निश्चितपणे सोव्हिएत संघ व स्टॅलिनला एक प्रकारचा इशारा होता व हीच खऱ्या अर्थाने शीतयुद्धाची सुरुवात होती असे म्हणणे वावगे ठरू नये.

**सुरक्षा करार**

शीतयुद्ध कालात अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन्ही महासत्तांनी आपापल्या मित्रराष्ट्रांसोबत मैत्री-करार करून सामूहिक सुरक्षिततेचे तत्त्व अंगिकारल्याचे लक्षात येते. शीतयुद्धाच्या काळात झालेले काही महत्त्वाचे मैत्री-करार खालीलप्रमाणे आहेत:

**नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन- नेटो (North Atlantic Treaty Organisation-NATO)**

१९४५ साली फ्रँकलीन डिलानो रुझवेल्ट यांच्या मृत्यूनंतर हॅरी ट्रूमन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले व त्यांनी दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत संघाच्या बाबतीत कडक भूमिका घेण्याचे ठरविले. म्हणजेच त्यांनी स्टॅलिनच्या चालींना जशास तसे व सडेतोड उत्तर देण्याची भूमिका घेतली. ट्रूमन व त्यांच्या युरोपियन मित्रांना सोव्हिएत संघापासून इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेच्या युरोपातील इतर मित्र-राष्ट्रांना संरक्षण देण्यासाठी एक करार करावा व एक लष्करी संघटना स्थापन करावी असे वाटले. या विचाराने व उद्दीष्टाने ४ एप्रिल १९४९ रोजी एक लष्करी संघटना अस्तित्वात आली जिचे नाव होते- नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन- नेटो. हा करार अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसी येथे झाला. ड्वाईट आयझेनहॉवर हे 'नेटो' चे पहिले सेनापती बनले. आयझेनहॉवर यांनी दुसऱ्या महायुद्धात देखील अमेरिकन सैन्याचे नेतृत्व केले होते. ते १९५२ साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले. आयझेनहॉवर हे रिपब्लिकन पक्षाचे सदस्य होते. नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन- नेटो या करारात सामील झालेले देश पुढीलप्रमाणे होते- बेल्जीयम, कॅनडा, डेन्मार्क, फ्रान्स, आइसलँड, इटली, लक्झेमबोर्ग, नेदरलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल, युनायटेड किंगडम (इंग्लंड) व अमेरिका. जरी हे बारा देश 'नेटो' चे संस्थापक असले तरी कालांतराने पुढील देश देखील या संघटनेत सामील झाले- ग्रीस (१९५२), तुर्कस्तान (१९५२), पश्चिम जर्मनी (१९५५), सध्याचा एकसंघ जर्मनी (१९९०), स्पेन (१९८२), झेक रिपब्लिक-प्रजासत्ताक (१९९९), हंगेरी (१९९९) व पोलंड (१९९९).

पुढील देशांनी २००० सालानंतर विविध टप्प्यांमध्ये नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन- नेटो या संघटनेचे सदस्यत्व पत्करले- बल्गेरिया (२००४), इस्टोनिया (२००४), लॅटविया (२००४), लिथुआनिया (२००४), रोमानिया (२००४), स्लोव्हाकिया (२००४), स्लोवेनिया (२००४), अल्बेनिया (२००९), क्रोशिया (२००९) व मॉंटेनिगेरो (२०१७).

नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन- नेटो या करारातील कलम क्रमांक ५ आपले लक्ष वेधून घेते. 'या कलमात असे म्हटले आहे की, या करारात सहभागी झालेल्या युरोपातील व उत्तर अमेरिकेतील एकाही राष्ट्राविरुद्ध जर इतर कोणत्याही राष्ट्राने हल्ला केला तर तो हल्ला फक्त त्या राष्ट्रावरीलच हल्ला नव्हे तर नेटो संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांवरील हल्ला समजला जाईल.' याचाच अर्थ असा की, या संघटनेतील कुठल्याही एका राष्ट्रावर इतर देशाने वक्रदृष्टी फिरवली वा हल्ला केला तर या तहात सहभागी झालेले सर्व देश एकत्र येऊन त्या हल्ल्याचा मुकाबला करतील. अर्थात या कलमाद्वारे 'नेटो' संघटनेतील देश व प्रामुख्याने अमेरिका ही सोव्हिएत संघाला एक प्रकारचा इशारा देत होती असे तज्ज्ञांचे मत आहे.

**बगदाद पॅक्ट ऑर्गनायझेशन (मिडल ईस्ट ट्रिटी ऑर्गनायझेशन)**

प्रामुख्याने युनायटेड किंगडम (इंग्लंड) या देशाच्या सुचनेनुसार बगदाद पॅक्ट ऑर्गनायझेशन (मिडल ईस्ट ट्रिटी ऑर्गनायझेशन) हा (तह वा) करार १९५५ साली करण्यात आला. या तहाचा मुख्य उद्देश सोव्हिएत संघ व साम्यवादाचा मध्य-पूर्व वा पश्चिम आशियातील देशांमध्ये प्रभाव व प्रसार रोखणे हा होता. याचे कारण मध्य-पूर्व हा तेलसंपत्तीयुक्त (खनिज तेल ज्यापासून पेट्रोल, डिझल, केरोसिन, आदी बनवले जाते) प्रदेश होता. येथील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात तेलाचे साठे होते. त्यामुळे या प्रदेशावर वा येथील देशांवर जर सोव्हिएत संघाचा प्रभाव वाढला तर ते इंग्लंड, अमेरिका व त्यांच्या मित्रराष्ट्रांना परवडणारे नव्हते. त्यामुळे १९५५ साली युनायटेड किंगडम (इंग्लंड), इराण, इराक, पाकिस्तान व तुर्कस्तान या देशांनी एकत्र येऊन बगदाद पॅक्ट ऑर्गनायझेशन (मिडल ईस्ट ट्रिटी ऑर्गनायझेशन) हा करार केला. या करारात सामील झालेल्या देशांमध्ये विविध बैठका घेण्याच्या व चर्चा करण्याच्या दृष्टीने याचे मुख्यालय इराकची राजधानी बगदाद येथे ठेवण्यात आले.

१९५९ मध्ये इराक हा देश या तहातून (वा करारातून) बाहेर पडला व अमेरिका हा देश सहयोगी सदस्य म्हणून सहभागी झाला. इराक या करारातून बाहेर पडल्यानंतर हा करार सेंट्रल ट्रिटी ऑर्गनायझेशन (सेंटो) या नावाने ओळखला जाऊ लागला. तसेच, याचे मुख्यालय बगदाद वरून तुर्कस्तानची राजधानी अंकारा येथे हलविण्यात आले. १९७९ साली इराणमध्ये अयातोल्लाह खोमेनी या इराणी धर्मगुरुच्या नेतृत्वाखाली तेथे इस्लामिक क्रांती झाली व तेथील मोहम्मद रेझा शहा याची राजवट संपुष्टात आली. मोहम्मद रेझा शहा हा अमेरिका व तिच्या मित्र राष्ट्रांसोबत चांगले संबंध राखून होता. परंतु अयातोल्लाह खोमेनी हा या पाश्चिमात्य राष्ट्रांचा टीकाकार होता. त्यामुळे इराणमध्ये खोमेनीच्या नेतृत्वाखाली सत्ता आल्यावर इराण देखील 'सेंटो' या करारातून बाहेर पडला व यानंतर हा करार एकप्रकारे वा संपुष्टात आला.

**ॲन्झस पॅक्ट (ANZUS Pact)**

ॲन्झस पॅक्ट हा करार ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (अमेरिका) या देशांनी एकत्र येऊन केलेला करार होता. तसे पाहता 'ॲन्झस' हा शब्द या तीन देशांच्या नावातील पहिले इंग्रजी अद्याक्षर घेऊन बनलेला आहे. या करारावर ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड व युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (अमेरिका) या देशांनी १ सप्टेंबर १९५१ रोजी अमेरिकेच्या कॅलिफोर्निया या राज्यातील सॅन फ्रान्सिस्को या शहरात स्वाक्षऱ्या केल्या. हा करार पॅसिफिक ट्रिटी सेक्युरिटी (Pacific Treaty Security) या नावाने देखील ओळखला गेला. या करारातील कलमांची अंमलबजावणी १९५२ सालापासून सुरू झाली असे तज्ज्ञांचे मत आहे. ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंड या आपल्या दक्षिण प्रशांत महासागरातील मित्रराष्ट्रांना अमेरिकन लष्करी संरक्षण देण्याच्या दृष्टीने अमेरिकेच्या आर्शीर्वादाने हा करार झाला होता असे अभ्यासक म्हणतात. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व जपान यांच्यातील संबंध सुधारत गेले व अमेरिका जपानला मोठ्या प्रमाणात आर्थिक व इतर बाबतीत मदत करू लागली. चीनमध्ये १९४९ साली साम्यवादी क्रांती झाल्यानंतर अमेरिकेने अति-पूर्वेत साम्यवादाचा वाढता प्रभाव रोखण्याच्या दृष्टीने जपानला सर्वोतोपरी मदत करून प्रबळ करण्याचे धोरण अवलंबिले. यामुळे ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंड या देशांना काळजी वाटू लागली. याचे कारण असे की, दुसऱ्या महायुद्धादरम्यान या देशांचा जपानविषयीचा अनुभव चांगला नव्हता.

दुसऱ्या महायुद्धात जपानचे नौदल या देशांच्या समुद्र किनाऱ्यांपर्यंत येऊन पोहोचले होते व जपानला दुसऱ्या महायुद्धात हे देश देखील गिळंगृत करण्याची महत्त्वाकांक्षा होती यात वाद नाही. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा अमेरिका व जपान जवळ येऊ लागले तेव्हा अर्थात ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंड हे दोन देश काळजीत पडले. त्यामुळेच त्यांना लष्करी मदत देण्याच्या दृष्टीने व त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याच्या दृष्टीने अॅन्झस पॅक्ट हा करार झाला. या करारात सहभागी झालेल्या देशांचे प्रतिनिधी साम्यवादाचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने आपापसांत चर्चा करत असत.

१९८४ साली या कराराच्या बाबतीत एक महत्त्वपूर्ण बाब घडली व ती अशी की, न्यू झीलंड या देशाने आपल्या आसपासच्या समुद्र किनाऱ्याला 'अण्वस्त्र मुक्त' क्षेत्र म्हणून घोषित केले. याचा भाग म्हणून न्यू झीलंडने आपल्या बंदरांत कुठल्याही अण्वस्त्रधारी जहाजाला व पाणबुडीला येण्यापासून मनाई केली. यात अमेरिकन अण्वस्त्रधारी जहाजांचा व पाणबुड्यांचादेखील समावेश होता. त्यामुळे या करारातील कलमांचे न्यू झीलंडच्या बाबतीत अंमलबजावणी करण्याचे अमेरिकेने १७ सप्टेंबर १९८६ पासून नाकारले व एकप्रकारे न्यू झीलंडने या करारातील आपले सदस्यत्व गमावले व येथून पुढे अमेरिका व ऑस्ट्रेलिया हे दोनच देश या करारातील वा तहाचे सदस्य म्हणून राहिले.

### साऊथ ईस्ट एशिया ट्रिटी ऑर्गनायझेशन-सिएटो (South East Asia Treaty Organisation-SEATO)

साऊथ ईस्ट एशिया ट्रिटी ऑर्गनायझेशन-सिएटो ही एक आग्नेय आशियातील प्रादेशिक संघटना होती जी साऊथ ईस्ट एशिया कलेक्टिव डिफेन्स ट्रिटी या तहानुसार अस्तित्वात आली होती. या तहाच्या वा करारावर सदस्य राष्ट्रांनी ८ सप्टेंबर १९५४ रोजी फिलीपाईन्स या देशाची राजधानी मॅनिला (Manila) येथे स्वाक्षऱ्या केल्या. फिलीपाईन्स हा प्रशांत महासागरातील अनेक बेटांनी बनलेला देश आहे वा म्हणजेच तो एक द्वीपसमूह आहे. ज्या ईस्ट एशिया कलेक्टिव डिफेन्स ट्रिटी तहामुळे साऊथ ईस्ट एशिया ट्रिटी ऑर्गनायझेशन-सिएटो ही संघटना अस्तित्वात आली त्यावर ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, न्यू झीलंड, पाकिस्तान, फिलीपाईन्स, थायलंड, युनायटेड किंगडम व युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (अमेरिका) या देशांनी स्वाक्षऱ्या केल्या. आग्नेय आशियात साम्यवादाचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने साऊथ ईस्ट एशिया ट्रिटी ऑर्गनायझेशन-सिएटो ही संघटना अस्तित्वात आली. या संघटनेकडे नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन-नेटो सारखे लष्करी बळ नव्हते. मात्र या देशांदरम्यान आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने सहकार्य मात्र होते.

३० जून १९७७ रोजी 'सिएटो' ही संघटना संपुष्टात आली. त्याअगोदर १९६८ साली पाकिस्तान या संघटनेतून बाहेर पडला व १९७५ साली फ्रान्सने या संघटनेला आर्थिक मदत देणे बंद केले.

क्रमशः

**- सहा. प्रा. सुभाष गं शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
वि. प्र. मं. चे जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
९८२०३२८२२६
subhashinscotlandgmail.com

स्वर्ग आणि नरक हे पृथ्वीवरच आहेत !

# संगीत मनमोही रे
## भाग १ : सप्तसूर आणि स्वरांगण

*'संगीत मनमोही रे' या संगीत विषयीच्या लेखमालेतील 'सप्तसूर आणि स्वरांगण' या लेखाने या लेखमालिकेची सुरुवात करीत आहोत - संपादक*

मानवी मनाच्या भावभावनांशी सर्वात जवळचं नातं कोणाचं असेल तर ते निःशंकपणे संगीताचं! जंगलातून शिकार करताना पशु-पक्ष्यांचा आवाज माणसाच्या कानावर पडला. या आवाजाचे अनुकरण किंवा नक्कल करण्याच्या प्रयत्नातून मानवी कंठातून सहज ध्वनींची निर्मिती झाली आणि त्यातून स्वरांची निर्मिती झाली असं मानलं जातं. प्राचीन काळात हे 'स्वरसंगीत' फक्त तीन किंवा चार स्वरांतच गायलं जायचं. याचा संदर्भ असा की, भारतीय इतिहासातील प्राचीनतम कालखंड म्हणजे वेदकाल. चार वेदांमधील पहिला वेद ऋग्वेद. यामध्ये अनुदात, उदात आणि स्वरीत अशा तीनच स्वरांचा उल्लेख आढळतो. त्यानंतर अनेक कालखंड गेल्यावर मार्गी संगीत किंवा जाती गायन ३ ते ४ स्वरांमधून गायलं जाऊ लागलं. रानावनातील आदिवासी लोकगीतं, पारंपरिक भोंडल्याची गीतं, आरत्या किंवा धार्मिक गीतं आजही या चार स्वरांतच गायली जातात. मग आजच्या संगीतातील सात स्वरांची निर्मिती कशी झाली असावी? या बद्दलच्या अनेक संशोधनांपैकी कै. गोविंदराव टेंबे यांच्या ''कल्पना संगीत'' ग्रंथातील विवेचन सयुक्तिक मानलं जातं. त्याप्रमाणे पुरुषांच्या कंठातून निघालेल्या चार स्वरांचं अनुकरण स्त्रियांनी केलं. स्त्रियांचा स्वर निसर्गतःच पुरुषांच्या स्वराच्या दीडपट उंच असल्यामुळे पुरुषांच्या स्वरातील ''सा रे ग म'' स्त्रियांनी गायले की ते झाले पुरुषांच्या स्वरातील ''प ध नि सा''. हा विचार ग्राह्य मानला जातो कारण 'प' किंवा 'पंचम' हा स्वर 'सा' किंवा 'षड्ज' स्वरापासून बरोबर दीडपट फ्रिक्वेन्सीचा आहे. अगदी प्रात्यक्षिक बघायचं असेल तर हार्मोनियम या वाद्यावर काळी १ पट्टी वाजवा. हा पुरुषांचा स्वर मानला जातो. या पट्टीला 'सा' मानून वाजविले तर 'प' हा स्वर बरोबर काळी ४ या पट्टीवर येतो, ज्याला स्त्रियांचा स्वर मानला जातो. अशी झाली ''सा रे ग म प ध नि सा'' स्वरांची निर्मिती ! आता हे तर संख्येने ८ स्वर दिसतात ! हो, पाश्चात्य संगीतात हे ८ स्वर मानले आहेत. पण भारतीय संगीत हे 'सप्तक' म्हणजे ७ स्वरांचं मानलं जातं. याचं कारण म्हणजे शेवटी येणारा आठवा स्वर हा पहिल्या स्वराच्या बरोबर दुप्पट अंतरावर आहे ! इथूनच सुरू होतं दुसरं सप्तक, ज्याला पाश्चात्य संगीतात 'ऑक्टेव (octave)' म्हटलं जातं. भारतीय स्वरसप्तकातील ''सा रे ग म प ध नि'' या मूळ ७ स्वरांना शुद्ध स्वर म्हणतात. त्यांची नावे ''षड्ज, रिषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद''. जे स्वर आपले स्थान (फ्रिक्वेन्सी) सोडून कमी उंचीचे (फ्रिक्वेन्सीचे) होतात त्यांना 'कोमल स्वर' म्हणतात आणि जे स्वर आपले स्थान (फ्रिक्वेन्सी) सोडून जास्त उंचीचे (फ्रिक्वेन्सीचे) होतात त्यांना 'तीव्र स्वर' म्हणतात. अशा प्रकारे 'रे ग ध नि' हे चार स्वर आपले स्थान सोडून कोमल होतात; तर 'म' हा एकटाच स्वर तीव्र होतो आणि बनतं १२ स्वरांचं भारतीय संगीतातील तेजोमय स्वरांगण !!

(क्रमशः)

**- डॉ. कीर्ती आगाशे**

●●●

# खेडेगाव...

*गावातील अंतरंगाचे वर्णन या लेखात विशद केले आहेत.- संपादक*

सद्याची परीस्थिती लक्षात घेता लोक शहरांपेक्षा आपल्या गावाकडे राहणे पसंत करत आहेत. सध्या गावामधील ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका इत्यादी गावातील लोकांच्या आरोग्यविषयी माहिती सरकारपर्यंत पोहोचवत आहेत. गावातील काही वयस्कर लोकांच्या मते अशी परिस्थिती पहिल्यांदा अनुभवायास मिळत आहे. किंबहुना जे लोक मोठ्या कंपनीमध्ये कार्यरत आहेत ते या आपत्तीमध्ये शेतीत काम करण्यात सुख मानत आहेत. म्हणून मी नव्याने पाहिलेला माझा गाव.........

ज्या परीसराभोवती कसदार शेतीला योग्य जमीन आहे, तसेच जेथे शेती होते आणि त्यासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध आहे अशा ठिकाणास 'गाव' असे म्हटले आहे. आधुनिक काळात जेथे शेती आणि व्यापारउदीम चालतो त्यास 'गाव' असे म्हणता येईल. गाव हे साधारणपणे नदीकाठी अथवा पाण्याचे स्रोत असतील अशा ठिकाणी वसलेले आढळते. माझ्या गावाचे नाव मल्हारपेठ आहे. माझे गाव खूप सुंदर आहे. गावामध्ये राहणारी जी माणसे असतात त्यांना 'गावकरी' असेही संबोधले जाते. गावचा प्रमुख हा 'सरपंच' असतो. तसेच तो गावातील पहिला प्रतिनिधीही असतो. गावाचे लोकवस्तीनुसार विभाग आढळतात. लोकवस्ती वाढल्यावर गावांची उपगावे तयार होतात. अशी मूळ गावापेक्षा लहान वस्ती असल्यास त्यास 'बुद्रूक' व मुख्य गावास 'खुर्द' असे पूर्वी संबोधले जात असे. गावातील लोकसंख्या उपभागामध्ये विभागली जाते.

बलुतेदारी पद्धतीमध्ये महार, मांग, चांभार यांच्या सेवा सर्व गावासाठी होत्या; परंतु त्या गावातील इतर बलुतेदारांच्या सेवा ह्या चांभार, मातांग महार यांच्या साठी होत्या का? तर याचे उत्तर 'नाही' असे आहे. आपल्याला या संस्कृतीचे उत्तम दर्शन रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे येथे 'प्राचीन कोकण' या प्रकल्पात होते. तसेच गावाची रचना कशी असावी याची सुंदर कल्पना कराड जिल्ह्यातील बेलदरे येथे 'आपला गाव' या प्रकल्पातून मांडली आहे. गावकडे अलीकडच्या काळात ही परंपरा लोप पावत चालली आहे. आजकाल बलुतेदारी ही आमच्या गावात थोड्याफार प्रमाणावर चालू आहे. सुतार, चांभार, वारीक, लोहार यांची बलुतेदारी आज चालू आहे. पूर्वी गावामध्ये बारा बलुतेदार पद्धती चालू होती.

व्यापार म्हणजे वस्तू व सेवा एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे रोखीने किंवा उधारीने केली जाणारी देवाणघेवाण होय. व्यापाराला 'व्यवहार-बाजार' असेही म्हटले जाते. गावाला जगामध्ये काय चालले आहे याची माहिती व्हावी आणि त्यासाठी आकाशवाणीचा उपयोग करावा असे तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे. म्हणजेच तंत्रज्ञानाचा गावाच्या विकासासाठी उपयोग करण्याचे महत्त्व तुकडोजी महाराजांनी विषद केले आहे. अलीकडच्या काळात माहिती, तंत्रज्ञान आणि संवादाच्या क्षेत्रात आमूलाग्र क्रांती झाल्याचे आढळून येत आहे. याचाच उपयोग ग्रामीण विकासात करून घेण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विविध उपयोगांकरिता तंत्रज्ञानाचा

वापर करण्यास सुरुवात झाली आहे. त्यातून गावांचा विकास घडून येत आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कृषीक्षेत्रात तर दखलपात्र बदल घडून येत आहेत. प्रथम कृषीक्षेत्रातील काही नव्या तंत्रांची माहिती घेतली पाहिजे.

अलीकडच्या दशकात शेतीमध्ये 'नॅनो' तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येत आहे. नॅनो म्हणजे छोटा. ८० च्या दशकात जन्म घेतलेल्या नॅनो तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वनस्पतींमधील सुप्त गुणांवर प्रयोग करून जाती विकसित करण्यामध्ये शास्त्रज्ञांना यश प्राप्त झाले आहे. नॅनो चिप्सच्या सहाय्याने वनस्पतींमध्ये असणाऱ्या विविध जनुकांची चाचणी केली जाते. त्यातून कोणते जनुक वनस्पतीच्या चांगल्या स्थितीत व आजारपणाच्या काळात स्थिरावते किंवा क्रियाशील राहते याची कल्पना येते. या नॅनोतंत्राचा वापर करून पिकांवर पडणाऱ्या किडी आणि रोगांचे नियंत्रण करता येते. नॅनो यंत्र अथवा नॅनो उपकरणे यांच्या माध्यमातून वनस्पतीची सुदृढता करून घेता येते. यात तंत्राच्या सहाय्याने रासायनिक खतांचा अमर्यादित वापर, आरोग्यावर होणारा परिणाम व जमिनीचे प्रदूषण कमी करण्यास मदत होते. तसेच पिकांच्या उत्पादन क्षमतेच्या वाढीसाठीही या तंत्राची मोठी मदत होते. भाजीपाला साठवण व त्यावरील प्रक्रियेसाठी या तंत्राचा उपयोग करण्यात येतो. ज्यामुळे उत्पादन वाढण्यास मदत तर होतेच; मात्र त्यातून गावातील शेतकऱ्यांचा आणि पर्यायाने गावाचा विकास साधण्यास मदत होते. याशिवाय लेसरचा वापर करून शेताचे सपाटीकरण, शेतात रेन वॉटर हार्वेस्टिंग, जमिनीचे परीक्षण करण्याची पोर्टेबल कीट वापरणे इत्यादी देखील नव्या तंत्रज्ञानाची कृषी क्षेत्रातील उपयोगासाठी उदाहरणे देता येतील.

शेतीमध्ये नैसर्गिक संसाधनांच्या वापराला देखील नव्या तंत्रज्ञानाची जोड देता येणे शक्य झाले आहे. सौर ऊर्जेचा उपयोग पाणी गरम करणे, पदार्थ शिजविणे याबरोबरच रात्रीच्या वेळी प्रकाश निर्माण करण्यासाठी होतो. अलीकडच्या संशोधनाने आता पिके, फलोत्पादन, खुली कोठारे, कृषीभवने इत्यादींचे संरक्षणासाठी सुद्धा सौरऊर्जेचा वापर करणे शक्य झाले आहे. ''सौर फोटोव्होटाईक विद्युत कुंपण'' या तंत्राद्वारे हे संरक्षण करता येऊ शकते. यामध्ये रक्षित करावयाच्या क्षेत्रात दिलेल्या कुंपणामध्ये सौरऊर्जेद्वारे सौम्य प्रमाणात वीज प्रवाहित केली जाते. ज्याद्वारे रानटी जनावरे, गुरेढोरे इत्यादींनी विद्युत कुंपणाला स्पर्श केल्याबरोबर त्यांना ०.०००३ सेकंद एवढा विद्युत धक्का जाणवतो. शिवाय ज्यातून कुंपणाला व जनावरांना कोणत्याही प्रकारची दुखापत होत नाही. मात्र ती जनावरे पुन्हा त्या कुंपणाला स्पर्श करत नाहीत. आणि आपले क्षेत्र त्यांच्यापासून सुरक्षित राहते. या तंत्राला 'सौर कुंपण' म्हणूनही संबोधले जाते.

एखाद्या रोगाची लागण कोणत्याही प्रदेशात झाली तरी त्यावर त्या ठिकाणी वेळोवेळी केलेल्या योग्य आणि यशस्वी उपाययोजनेबाबतची माहिती आपल्याला इंटरनेटच्या माध्यमातून मिळते. ज्यामुळे आपल्याकडे तशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यावर त्या उपाय योजनांची माहिती घेता येऊ शकते. तसेच, अधिक प्रयोगशील शेतकऱ्यांना नवे प्रयोग राबविण्यासाठी मोठी मदत होते. याशिवाय दररोजचे हवामान, वेधशाळेचा पावसाचा अंदाज इत्यादी माहितीदेखील आपण इंटरनेटच्या सहाय्याने प्राप्त करून घेऊ शकतो.

संगणक, मोबाईल, आणि टॅबलेट्स इत्यादी साधने म्हणजे तर नव्या तंत्रज्ञानाचा आविष्कारच म्हणावा लागेल. संगणकाने माणसाचं जगणंच समृद्ध झालं आहे. संगणकाच्या सहाय्याने विविध कामे करून गावातील बेरोजगारांना नवा उद्योग मिळू लागला आहे. यातून गावामध्येच व्यवसायाच्या नवीन संधीही निर्माण झाल्या आहेत. तसेच, गावात राहात असतानाच शेती किंवा एखादा जोडधंदा करीत असतानाच शैक्षणिक पात्रता

वाढविणे शक्य झाले आहे. असे अभ्यासक्रम पूर्ण करून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घरबसल्या शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध झाली आहे. ज्यायोगे गावातील युवकांना उच्च शैक्षणिक पात्रता धारण करणे शक्य झाले आहे. अल्प भांडवलात आपल्यालाच गावामध्ये संगणक प्रशिक्षण केंद्र उभे करता येऊ शकते. ज्यातून नवा व्यवसाय निर्माण होऊ शकतोच आणि गावाला संगणकाने ज्ञान दिल्याचे समाधानही मिळू शकते.

गावातील 'आठवडा बाजारा'तही आता तंत्रज्ञानाची जोड देता येणे शक्य होऊ लागले आहे. आपल्या उत्पादनाची माहिती संगणकाच्या सहाय्याने इंटरनेटद्वारे जगासमोर मांडता येते. यामुळे व्यापाऱ्यांना आपल्या शेतातील उत्पादनांची माहिती संगणकाच्या पडद्यावर पाहणे शक्य झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जन्म-मालासारखा अधिक माल लोकांपर्यंत पोहचविता येणे शक्य झाले आहे. तसेच, यातून उत्पादित माल लवकरच विकला जाण्याची शक्यता वाढली आहे.

गावात काम करणाऱ्या शासन नियुक्त प्रतिनिधींना, ग्रामपंचायतच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठीसुद्धा नव्या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येत आहे. संगणकाच्या मदतीने गावामध्येच बसून आता आपण आपल्या रेल्वे प्रवासाचे, बस प्रवासाचे आरक्षणही करू शकतो. ज्यामुळे आपला वेळ आणि श्रम वाचतात. यापलीकडे जाऊन गावाबाहेर असणाऱ्या गावकऱ्यांना गावाच्या विकासात समाविष्ट करून घेण्यासाठी त्यांना गावातील परिस्थिती, हवामान, पीक-पाऊस, गावातील एखादी घटना इत्यादी माहितीच्या देवाण-घेवाणीकरिता ई-मेलचा, एस एम एस चा, मोबाईलचा वापर करणे शक्य झाले आहे. ज्याजोगे बाहेरून येणारे किंवा गावाबाहेर असलेल्या व्यक्तींना गावाशी जोडल्याचे समाधान तर मिळतेच. याशिवाय गावासाठी काही मदत, सहकार्य करावयाचे असल्यास त्यांना त्यांच्या कामात उपयोग होऊ शकेल. याशिवाय गावातील संगणक प्रशिक्षित वर्ग मिळून गावाची संपूर्ण अद्ययावत माहिती देणारा ब्लॉग तयार करू शकतो. ज्यातून गावाची सर्व माहिती एकाच ठिकाणी संगणकाच्या पडद्यावर कोणालाही पाहता येऊ शकेल. ज्यातून आपल्या संपर्कात नसलेल्या गावकऱ्यांपर्यंतही आपली माहिती पोहोचू शकते. आणि त्यांनाही निरनिराळ्या माध्यमांतून गावाच्या विकासासाठी हातभार लावता येऊ शकेल. आता एवढी सारी साधनं आपल्याकडे असतांना केवळ त्यांचा सुयोग्य वापर करणं महत्त्वाचं आहे. चला तर मग, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूया आणि आपल्या गावाचा विकास साधू या.

**– महेश काळे**

•••


**दि शा नियमित वाचा.**

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*


सर्व गोष्टींच्या बाबतीत नेहमीच निराशेपेक्षा आशा बाळगणे चांगलेच असते.

# मराठी असे आमुची मायबोली

*भाषा व मराठी भाषा यांचे महत्त्व या लेखात विशद केले आहे.- संपादक*

आत्मप्रकटीकरण धडपडीतून भाषेचा जन्म झाला. भाषेच्या माध्यमातून माणूस आपले विचार, भावना आशा-आकांक्षा, इच्छा, सुख दुःख प्रकट करू शकतो. हळूहळू भाषा ही मानवाच्या जीवनाशी इतकी एकरूप झाली की भाषा जीवनाचा श्वास झाली. भाषेने मानवी जीवनाचा पाया मजबूत केला. ज्याची भाषा समृद्ध त्याची विचारशक्ती चांगली असा एक सिद्धांत आहे. माणसाच्या वैचारिक विकासात भाषेचा सिंहाचा वाटा आहे.

नि:शब्द आणि शब्दमय भाषा असे भाषेचे दोन प्रमुख प्रकार सांगता येतील. नि:शब्द भाषेत शरीर अवयवांच्या हालचाली, हातवारे आणि खाणाखुणा यांच्या मदतीने माणूस दुसऱ्याला काही सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. ते करीत असताना त्याच्या चेहऱ्यावर भाव प्रकट होतात. खाणाखुणा, हातवारे, मुद्राभिनय यांच्या माध्यमातून तयार झालेली मानवाची पहिली भाषा होय. त्यानंतर भाषेत आवाजांची भर पडली. आवाज किंवा ध्वनीही अर्थपूर्ण असतात. त्यांना अर्थ लावले जातात. आणि सार्वत्रिक अर्थही प्राप्त करून दिले जातात पण त्याला खूपच मर्यादा पडतात. ठरावीक व ढोबळच गोष्टी ध्वनीच्या माध्यमातून व्यक्त होतात. ध्वनी आणि आवाजाच्या नंतर प्रकट झाली ती शब्दांची भाषा. भाषेच्या माध्यमातून मानवी जीवनात विविध प्रकारच्या भावनांचा अनुभव घेता येतो. भावनांच्या अनुभूतींतून मूल्यांचे संस्कार होतात. मानवाच्या जडणघडणीचे कार्य भाषा करते. भाषेने निर्माण केलेल्या साहित्यातून भावजागृती होते. माणसाच्या जीवनात आनंदाचे मळे फुलतात. जीवनात अलौकीक आनंद भरतो. असे भाषेचे सामर्थ्य सर्वगामी आणि सर्वस्पर्शी आहे. बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाची सुरुवात त्याच्या मातृभाषेतून होते.ती त्याच्या हृदयाची भाषा असते. कोलरीजच्या शब्दात सांगायचे तर Mothertongue is the Language of Heart.

बालकाच्या प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत एक विषय म्हणून, तसेच इतर सर्व विषय अभ्यासण्याचे माध्यम म्हणून मातृभाषेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. मानवी जीवनात आचारविचार, राहणीमान, धर्म, संस्कृती, मूल्ये यांच्या अभ्यासासाठी व ती प्रत्यक्षात आणण्यासाठी मातृभाषेचा उपयोग होतो.

भाषा ही वाङ्मयीन आवड व अभिरुची निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे. भाषेच्या माध्यमातून तोंडी व लेखी आत्मप्रकटीकरण प्रभावीपणे होते. विचार, भाषा, अनुभव, आदान-प्रदान करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. ज्ञानप्राप्ती करून घेणे व साहित्याच्या माध्यमातून मनोरंजन करणे ही कार्ये ही मातृभाषा सातत्याने करीत असते. विद्यार्थ्याचा व्यक्तिविकास साधण्याचे मातृभाषा हे एक प्रभावी साधन आहे. भाषा ग्रहणाच्या संदर्भात आपण श्रवण दक्षता आणि वाचन क्षमता यांचा विचार आपणास करावा लागतो. श्रवणक्षमतेच्या बाबतीत लक्षपूर्वक ऐकणे, संदर्भ लक्षात घेऊन ऐकणे, शब्दांचा व शब्दसमूहांचा अर्थ लावणे, मुद्दे लक्षात घेणे भाषेतील चुका सवयी लक्षात घेणे, आवश्यक त्या उणीवा दूर करून, त्यांना योग्य सवयी लावून, भावपूर्ण वाचन कसे करता येईल हे पाहावे.

विद्यार्थ्यांचा बोधात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक विकास होत असतो. आकलन ही बोधात्मक विकासाशी संबंधित आहे. आकलनाचा ज्ञान हा पाया असतो. ज्ञानापेक्षा अधिक काहीतरी आकलनात

सामावलेले असते. मराठी भाषेचा जीवनप्रवाह अनेक वीरांनी, ज्ञानवंतांनी, सत्पुरुषांनी खतपाणी घालून सशक्त केला. संत ज्ञानेश्वरांसारखे योगी, रामदासांसारखे खंदे मार्गदर्शक, माधवराव पेशव्यांसारखे कर्तृत्ववान राजे, बालगंधर्वांसारखे गानसम्राट, सावरकरांसारखे जहाल योद्धे, अतुलनीय गुणगान गाणारे शाहीर, अभंग रचणाऱ्या बहिणाबाई चौधरी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर हे सर्व महाराष्ट्राची शान मराठी मातीत जन्मलेली रत्ने.

संगणकाच्या शोधाने व इंटरनेटच्या प्रगतीने जग फारच जवळ येत चालले आहे. संस्कृत भाषा म्हणजे अमृतकुंभच. या अमृताचा आधार घेऊन मराठी भाषेच्या नवरचनेचे कार्य नेटाने केले गेले पाहिजे. आज भाषेला नवी आव्हाने आहेत. ती स्वीकारून त्यातून प्रगतीचा मार्ग शोधला गेला पाहिजे. हे आव्हान सोपे नाही याची जाणीव आहे, पण अशक्य नाही.

मराठी बोली हे महाराष्ट्राचे खास भूषण आहे. भारतात इतर राज्यभाषा आहेत. त्यात मराठीचा मानाने गौरव केला जातो. ज्ञानदेवांनी मराठीचा यथोचित सन्मान केलेला आहे. मूळ संस्कृत भाषेत प्रत्यक्ष भगवंतानी अर्जुनाला उपदेश केला. तो व्यासांनी गीतेच्या रूपाने एकूण अठरा अध्यायांत रचला. व्यासांनी हे महान कार्य केले. परंतु संस्कृत ही सर्वांची भाषा नसल्याने समाज्यातील सर्व स्तरांतील लोकांना गीतेतील तत्त्वज्ञान कळावे या उदात्त हेतूने ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या रूपाने तीच गीता मराठीत गुंफली. ज्ञानेश्वरीसारखा पवित्र ग्रंथ पुन्हा होणे दुर्लभ. शिवाय विश्वकल्याणासाठी, मानवतेच्या विकासासाठी सर्व प्राणिमात्रांच्या सुखासाठी 'पसायदान' मागून या शब्द सृष्टीच्या ईश्वराने आपल्या असीम त्यागाने सर्व जगताला चकित करून सोडले. कोणताही अभिमानी मराठी माणूस ज्ञानदेवांपुढे आदराने नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाही.

साहित्याच्या क्षेत्रातून मराठीचा खरा अवतार पाहण्यास मिळतो. गद्य, पद्य, नाट्य, आत्मवृत्त, प्रवासवर्णन इत्यादी क्षेत्रात मराठीने मुक्त संचार केला आहे. अनेक लेखक, कवी, नाटककार यांनी मराठी भाषेची सेवा केली. या सर्व घडामोडीत इतरही बरेच बदल घडून आले. मुख्य परिणाम झाला तो इंग्रजी भाषेचा. ही भाषा महाराष्ट्रात इतकी रुजली की, आज इंग्रजी भाषेचा आधार घेतल्याशिवाय मराठी भाषेला पूर्णत्व येत नाही. साध्यासाध्या संभाषणांतून मराठी भाषेबरोबरच इंग्रजी शब्द हमखास येतातच. शर्ट, रिझर्व, सायकल, मिनिट, अशील, कोर्ट, बँक असे अनेक शब्द आपण वापरतो. इंग्रज गेले पण त्यांच्या भाषेचा ठसा कायम ठेऊन गेले. परिणामी मराठी भाषेचा वापर कमीकमी होत चालला. आज मराठी भाषेच्या अस्मितेविषयी चर्चा होऊ लागली. मराठी भाषा बोलणाऱ्या घरात आज पुढील पिढी इंग्रजी भाषेचा अभ्यास करीत आहे. इंग्रजी माध्यम असणाऱ्या शाळांचे पेव फुटले आहे. महाराष्ट्रात दर कोसावर भाषा बदलते. त्यातील माधुर्य व चैतन्यही मनाला सुखावते. माणूस जन्माला येतो तो त्याच्या पूर्वपुण्याईने. भाषा नसती तर माणसाचे जिणे अशक्य झाले असते. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे.तो एकटा राहू शकत नाही. आधुनिक शोधामुळे माणसाने यांत्रिक मानवाचा शोध लावला. त्यात फक्त प्राण नाही, त्यामुळे भावना नाहीत. मानवाला अनेक ऋणांपैकी भाषेचे ऋण मान्य करावयास पाहिजे. भाषेचे अंशतः ऋण फेडणे म्हणजे तिच्यावर माया करणे, प्रेम करणे. हे जेव्हा आपण मराठी भाषेचे जतन करू, संगोपन करू त्यावेळी शक्य होईल. म्हणून प्रत्येक मराठी माणसाचे हे आद्य कर्तव्य ठरते की मराठी भाषेचे ऋण त्याने मानलेच पाहिजे. तिचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे । यत्ने करू ।
शब्द धन वाटू । जन लोक ।
– संत तुकाराम

**– सौ. मनिषा चव्हाण**
(शालेय ग्रंथपाल)

Email : manisha.chavan801gmail.com

●●●

पैसे मागे ठेवून मरण्यापेक्षा जीवन श्रीमंतीत घालवावे.

# संवेदनशीलता

*भावना आणि संवेदना याबद्दल लेखकाने विचार मांडले आहेत. - संपादक*

मनुष्याच्या जीवनातला महत्त्वाचा जगण्याचा आधार म्हणजे त्याच्या भावना आणि दुसऱ्यांच्या प्रती असलेली संवेदना. ह्या भावना आणि संवेदनांच्या जोरावर मनुष्य समाजात वावरतो आणि सामाजिक बांधिलकी जपतो. भावनाचे आणि संवेदना मनुष्याच्या जीवनाचे केंद्रबिंदू आहेत.

मनुष्याचे संपूर्ण जीवन ह्याच भावनेच्या आणि संवेदनांच्या वर्तुळाने व्यापलेलं आहे. बऱ्याच लोकांना हे माहीत देखील नसते की, भावनांची आणि संवेदनांची योग्य सांगड कशी घालावी आणि जीवन सकस कग बनवायचे. प्रत्येक मनुष्याची भावना प्रकट करण्याची आणि संवेदना अनुभवण्याची क्षमता ही भिन्न आहे. मनुष्याने आपल्या भावना आणि संवेदना ह्या योग्यवेळी हाताळल्या तर त्याच्या वैयक्तिक जीवनात आणि सामाजिक जीवनात आमुलाग्रबदल निश्चित होतो.

भावना ही मनुष्याच्या मानसिक, तसेच शारीरिक प्रतिसाद देण्याची पहिली पायरी आहे. मनुष्य पहिली भावना निर्माण करून कृती अमलात आणतो. भावना. भावना ह्या दोन प्रकारच्या असतात. चांगल्या आणि वाईट. चांगल्याचांगल्या भावना चांगली व्यक्ती आणि चांगला समाज घडवतो. तर ह्याच्या उलट वाईट भावना व्यक्तींमध्ये दुरावा आणि समाजात तेढ निर्माण करते.

भावना आणि संवेदना ह्या मनुष्याला अनुभवांतून मिळतात आणि काही त्या समाजिकीकरण (social elements) ह्यातून प्राप्त होतात. आपण जेव्हा सामाजिकीकरणाचा विचार करतो तेव्हा कुटुंब, स्नेही, मित्रपरिवार, शेजार, कामाचे ठिकाण, प्रसार माध्यम, मीडिया ह्या सर्वांचा मनुष्याच्या भावनेवर आणि संवेदनांच्या विचारसरणीवर नक्कीच प्रभाव पडतो.

जर आपल्याला सामाजिक बांधीलकी जपायची असेल तर दुसऱ्या मनुष्या प्रती, दुसऱ्या धर्मा प्रती, दुसऱ्या जाती प्रती चांगल्या आणि सकस भावना, तसेच संवेदना ह्या जपायलाच हव्या. हा विचार जर समाजातील प्रत्येक घटकाने अमलात आणला तर कुठलाच वाद उद्भवणार नाही; जसे की भाषावाद, प्रांतवाद, जातीवाद, जमातवाद इत्यादी.

समाज बांधिलकी बरोबर व्यक्तीगत आयुष्यात देखील चांगल्या भावना आणि संवेदना अनेक प्रकारचे वाद संपुष्टात आणतात; जसे की घरातील आपासातील भांडणे ह्या भांडणातून दूर होणारी नाती , गैरसमज तसेच कधी कधी विकोपाला गेलेल्याला गोष्टी ह्या संपुष्टात येतात.

भारतासारख्या देशाला जो धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या रंगात रांगलि आहे. तिकडे सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्षता संकल्पना खूप जपली जाते. कारण भारताच लौकिक विविधतेमध्ये एकता ह्यात सामावलेला आहे. भारता भारतात धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी समाजकंटक सोयस्कररित्या धर्माचा आधार घेऊन भावनिक प्रश्नांना हात घालून सामाजिक परिस्थिती दूषित करतात. काही धार्मिक नेते सामाजिक वाद आणि तेढ निर्माण करून राजकारणही करतात, जर उदाहरणच द्यायचे झाले तर राम मंदिर आणि बाबरी मशीजिद

प्रकरण, भारत व पाकिस्तान संबंध, काश्मिरी पंडितांचे प्रश्न.....आपण खूप वेळा सामाजिक असंतोष पाहिला. पण सकारात्मक संवेदना आणि भावनांनी ह्या विद्रूप प्रसंगाचे ना निवारण केले.... असो, मुळात मुद्दा हा आहे की, सकारात्मक भावना आणि संवेदना अंगाशी बाळगून राष्ट्र उभारण्यासाठी सगळ्यांनी आपला धर्म, पंत, जात, भाषा सोडून आपल्या राष्ट्रासाठी चांगल्या भावनांची शिदोरी घेऊन एकात्मतेने पाऊले पुढे टाकली पाहिजेत.....

असाच विचार आपल्या विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बेडेकर सर यांनी म्हटल्या प्रमाणे प्रत्येक माणसात 'सर्जनक्षमता' आहे आणि हीच 'सर्जनक्षमता' आपल्याला कठीण प्रसंगी मानसिक दृष्ट्या अधिक बळकट आणि सक्षम करते.

शेवटी जाता जाता एका वाक्याने निरोप घेतो.... Every Emotions are Your Choices..

**– स्वप्नील नंदकुमार मयेकर**
सुरक्षाकक्ष समन्वयक
विप्रमं महाविद्यालय परिसर, ठाणे
भ्रमणध्वनी – ९९२००८५८३७



## आठवड्याचा बाजार

आठवड्याचा बाजार ही संकल्पना आपण आवर्जून ऐकलेली असणार (weekly market) किंबहुना आपण ह्या अशा प्रकारच्या आठवड्याचा बाजारहाट देखील केलेला असणार. आठवड्याचा बाजार म्हणजे ग्रामीण भागातला एक दिवसीय मॉल, जिकडे सर्व उपयोगातल्या गोष्टी हमखास मिळतात उदाहरणार्थ सर्व प्रकारच्या भाज्या, कडधान्य, मसाले, कपडे, खेळणी, गृह-उपयोगी वस्तू इत्यादी आणि ते पण स्वस्त दरात !

त्याचबरोबरच खवय्यांची मज्जा असते. कारण ह्या बाजारात चविष्ट असे वडे, मिसळ, उसळ, भजी, जिलेबी, कुरमुरे, फरसाण, सरबत, थंडगार गोळा मिळतो. विशेष म्हणजे बच्चे कंपनीसाठी पण हा बाजार अगदी जवळचा ! कारण इकडे मिळणारे रंगीत फुगे, भिंगरी, खेळणी, आकाश पाळणा, झोके अशी बरीच गंमत – जंमत असते. हा आठवड्याचा बाजार म्हणजे गावकऱ्यांसठी एक प्रकारची एक दिवसीय सहलच !

माझ्या गावी म्हणजे मालवणला दर सोमवारचा आठवडा बाजार भरतो. हा बाजार समुद्र किनारी भरतो आणि ह्या बाजारात विवध प्रकारचे खडा मसाले (वार्षिक मसाला तयार करण्यासाठी लागणारे साहित्य), बेळगाव – कोल्हापूर – सांगलीच्या मिरच्या, गावरान भाजी, कोकम, काजू, फणस, आंबे, फुलझाड – फळझाडांची रोपटी, मालवणी झाडू (मालवणची खासियत), मातीची भांडी (सोरकुल), मातीच्या चुली, सुकी मासळी, ओली मासळी असे बरेच काही. मालवणच्या सोमवारच्या आठवड्याच्या बाजारात वस्तू सहज मिळतात.

असा आठवड्याचा बाजार प्रयेक गावा – गावात भरतो. ह्या बाजाराचा आठवड्यातला एक दिवस ठरलेला असतो आणि त्याची गावकरी म्हणजे मोठीमंडळी आणि बच्चेकंपनी आतुरतेने वाट बघत असतात.

पूर्वी आपल्या ठाण्यात देखील दर बुधवारी आठवड्याचा बाजार कोपिनेश्वर मंदिराच्या परिसरात भरत असे, असं माझी आजी सांगायची. आजी हे पण सांगायची की, आमच्या परिसरातली मंडळी दर आठवड्याच्या बाजाराला टांग्याने जायची आणि संपूर्ण आठवडा पुरेल इतकं सामान म्हणजे किराणा, भाज्या, मसाले आणायचे. त्यात भर म्हणजे चांगल्या चादरी, उशी कव्हर, कपडे, ॲल्युमिनियम भांडी दिसली तर ते पण घ्यायचे. त्याचबरोबर बाजारहाट झालं की घरी येताना गरमागरम भजी, वडे, बुंदी, जिलेबी आणायचे....... पण आता ठाण्यात काय, किंबहुना मोठ्या शहरातला हा आठवड्याचा बाजार गायब झालाय. त्याठिकाणी शहरात मॉल्स झाले. लोकांना ही वातानाकुल वातावरणात बाजारहाट करायला आता आवडते.

खरं तर आठवड्याच्या बाजारामुळे गावा – गावातलं भांडवल वाढायचं आणि अर्थकारण जोमाने चालायचं. ह्या बाजाराचा फायदा म्हणजे दुकानदारावर कुठलाच जास्त आर्थिक अतिरिक्त भार नाही. कारण दुकाने सकाळी मांडायची आणि सायंकाळी गुंडाळायची. ना जागेची कटकट, ना कुठला कर (टॅक्स) भरायचं टेन्शन, ना विद्युत जोडणी, ना हाताखाली कामगार लागायचे. म्हणून ह्या बाजारात वस्तू स्वस्त आणि कमी भावात मिळतात.

तेच आता मॉल्स मध्ये लागणारे कामगार, उपकरणे, मोठाली जागा, भरमसाठ वाढीव कर अशा अनेक गोष्टींमुळे मॉल्स, ऑनलाईन खरेदीची तुलना आठवड्याच्या बाजाराची होऊच शकत नाही. आजकाल शहरी भागात मोठ मोठाले मॉल्स आहेत किंवा ऑनलाईन खरेदी करू शकतो. तिकडे आठवड्याचा बाजाराची मज्जा आणि ग्राहकाबद्दल जी आपुलकी मिळायची ती मॉल्स किंबहुना ऑनलाईन खरेदी करताना नाही मिळत.

माझी आजी सांगायची आठवड्याच्या बाजारात दुकानवाले ग्राहकांशी चांगल्या परिचयाचे झाले होते. ते आपुलकीने आमची विचारपूस करायचे. म्हणून आठवड्याच्या बाजारात आपलेपणा, सामाजिक बांधिलकी दिसायची.

मी कधी गावी गेलो तर मालवणात भरणाऱ्या सोमवारच्या आठवड्याच्या बाजाराला नक्की भेट देतो आणि मस्त संपूर्ण बाजार फिरतो, नवीन वस्तू खरेदी करतो, बागेत लागवडीसाठी सुंदर फुलझाडांची रोपटी घेतो आणि शेवटी खास मालवणी उसळ-पुरी वर ताव मारतो आणि मगच घरी येतो.

तर अशी ही गंमत आठवड्याच्या बाजाराची.....

**– स्वप्नील नंदकुमार मयेकर**
सुरक्षाकक्ष समन्वयक
विप्रमं महाविद्यालय परिसर, ठाणे
भ्रमणध्वनी – ९९२००८५८३७

●●●



# एक कप च्या : चित्रपट समीक्षा

*सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांनी दिग्दर्शित केलेला 'एक कप च्या' हा २००९ साली प्रदर्शित झालेला चित्रपट. या चित्रपटाचे समीक्षण प्रा श्रीपाद जोशी यांनी प्रस्तुत लेखात केले आहे – संपादक*

सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांनी दिग्दर्शित केलेला 'एक कप च्या' हा २००९ साली प्रदर्शित झालेला चित्रपट बघितला. काशिनाथ या एका गरीब बस कंडक्टरची भूमिका किशोर कदम यांनी उत्तम पद्धतीने वठवली आहे. हा सिनेमा मनोरंजनासोबत प्रबोधन करतो हे या चित्रपटाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.




माहितीचा अधिकार २००५ साली आपल्याला प्राप्त झाला. या कायद्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. व्यवस्थेची असणारी खाबुगिरी, लोकांच्या कामाप्रती असलेली अनास्था या सगळ्याला चाप बसायला या कायद्याने मदत होईल असे भाकीत होते आणि ते खरे देखील ठरले. परंतु गरिबांपासून ते श्रीमंता पर्यंत किती लोक या कायद्याबद्दल सज्ञानी आहेत? किती लोक सज्ञानी असूनही या कायद्याचा वापर परिणामकारकपणे करतात ? हे तपासले तर निराशा हाती येते. संघर्ष नको, सरकारी ऑफिसात चकरा, व्यवस्थेला प्रश्न विचारणं नको, कुठलेही उपदव्याप नको, गोड बोलून, ओळखीने होता होईल तेवढे वा पैसे देऊन कामं करून घ्यायचे हाच मार्ग बहुतांश लोक निवडतात. या सर्व गोष्टीमागे भीती, अज्ञान असं बरंच काही असतं. नेमकं याच गोष्टीबद्दल लोकांना जागरूक करण्याचं काम हा सिनेमा करतो.

काशिनाथ हा कोकणातील एका खेडेगावात राहणारा साधा बस कंडक्टर. अगदी साधा सरळ गळ्यात माळ असलेला माणूस. कुठल्याही रुटला टाकलं तरी विनातक्रार काम करणारा. फिट येणाऱ्या मुलीला घेऊन तिचे पालक बसमधून प्रवास करताना ५०० रुपये तिकिटासाठी काशिनाथला देतात. सुट्टे पैसे नसल्याने काशिनाथ सांगतो की, नंतर पैसे मागून घ्या. ते प्रवासी पैसे परत घ्यायचे विसरतात आणि काशिनाथदेखील पैसे परत करायचे गर्दीत विसरून जातो. त्याला जेव्हा रात्री डेपोवर हिशेब देताना कळतं की तो त्या प्रवाशाला पैसे परत करायचं विसरला. तेव्हा त्याला भोवळ येते. तो आजारी पडतो. तो खूप सरळमार्गी असल्याने त्याला आपण मोठं पाप केलंय असं वाटतं. अशी सहृदयी माणसं आहेत खरी; पण ती तुलनेने कमी आहेत याचं दुःख वाटत राहातं.

तर असा आहे पापभिरू काशिनाथ. गरिबी असली तरी आहे त्या स्थितीत आनंदी जगणारा. त्याचं कुटुंबदेखील आनंदाच्या लहरीवर डोलताना प्रत्येक फ्रेममध्ये छानपैकी दाखवलं आहे. त्याची चारही मुले छोट्या छोट्या गोष्टींवरून गिरक्या घेताना, खोऽखोऽ

हसताना, आई निर्भेळ आनंद घेताना दाखवले आहे. सगळ्यात मोठा मुलगा नाटकाच्या वेडात आहे. तो उद्ध्वस्त पत्रकाराच्या भूमिकेचा सराव करताना, ओरडताना दाखवला आहे. तर काशिनाथची सुरकुत्या पडलेली आई म्हणजे ब्रोमा ही वाहणारी खळाळती खट्याळ नदी म्हणून समोर येते. वृद्धत्वाच्या कुरबुरी, चींतेच्या कपाळावरच्या आठ्या हे पात्र मिरवत नाही. किंबहुना काशिनाथ देखील एका प्रसंगात छातीला हात लावून 'मन प्रसन्न असेल तर आनंदी राहता येतं' असा कानमंत्र देतो.

या सर्व गरिबीत परंतु आपल्या आयुष्यात तक्रार न करता जगणारा ह्या गोजिऱ्या कुटुंबात एक गोष्ट घडते. ती म्हणजे ७५००० एवढं लाइट बील एका महिन्यात काशिनाथला येतं आणि तो गांगरून जातो. सुट्टीच्या सगळ्या तडजोडी करत तो वीजवितरण कम्पनीकडे चकरा मारतो. पण तिथली उदासीन व्यवस्था, अडेलतट्टू साहेब लोक त्याला जुमानत नाहीत. एक सामाजिक कार्यकर्त्या बाई याच दरम्यान माहितीच्या अधिकाराबद्दल समाजाला जागरूक करायचं काम करत असतात. ते ऐकून काशिनाथसुद्धा माहितीचा अधिकार वापरून आपल्याला ७५००० एवढं बील कसं आलं हे विचारण्याचं धाडस करतो. त्याला साथ मिळते त्याच्या एसटीचा ड्रायव्हर सय्यद याची. सय्यद हा सुद्धा मदत करणारा आणि चांगल्या वृत्तीचा माणूस आहे. दोन धर्माची ही दोन लोकं. म्हंटली तर दोन ध्रुवावर जगणारी. म्हटलं तर एकाच ध्रुवावर जगणारी. काशिनाथ आणि सय्यद यांचं नातं, त्यांची मैत्री हे एकात्मतेचं प्रतीक आहे. दुर्दैवाने धार्मिक तिढे निर्माण करून जातीत, धर्मात तिढे निर्माण करण्याचं काम व्यवस्था नेहमी करत असते. या पार्श्वभूमीवर काशिनाथ आणि सय्यद ही दोन पात्र एक आदर्श वातावरण नकळत समोर आणतात ज्याची आपणा सर्वांना गरज आहे.

काशिनाथचे वीज बील माफ होते का? त्यासाठी त्याला काय उपदव्याप करावे लागतात? बील भरले नाही म्हणून वीजमंडळ वीज बंद करत अशा परिस्थितीत दहावीला असणारा काशिनाथचा मुलगा कंदीलाखाली अभ्यास करतो आणि बोर्डात दुसरा व प्रांतात पहिला येतो तेव्हा काशिनाथच्या भावना काय असतात? हे सर्व बघण्यासाठी हा सिनेमा नक्की बघा..

या सिनेमात कोकण सुंदरपणे दाखवले आहे. किशोर कदमचे ठहराव घेत संयतपणे येणारे संवाद काशिनाथच्या भूमिकेला न्याय मिळवून देतात. काशिनाथचा निरागसपणा,साधेपणा किशोर कदम यांनी मस्तपैकी साकारला आहे.

या सिनेमात सामाजिक कार्य करणाऱ्या आणि माहितीचा अधिकार लोकांना समजावून सांगणाऱ्या बाईच्या तोंडी एक वाक्य आहे : 'आज प्रश्न विचारणारे आपण उद्या उत्तर देण्याच्या भूमीकेतसुद्धा असू शकतो'. मला वाटतं हे एक वाक्य माहिती देणारे आणि घेणारे किंवा माहिती देणं टाळू पाहणारे किंवा माहिती विचारण्यासाठी कचरणाऱ्या सगळ्यांनी आत्मसात केलं तर माहितीचा अधिकार चांगल्या पद्धतीने वापरता येईल. व्यवस्था बदलली पाहिजे. सरकार दरबारी प्रभावीपणे कामं झाली पाहिजेत, तशी मनोभूमिका तयार करण्याचं काम हा कायदा करो. त्यासाठी कुणाला तरी 'एक कप च्या' पाजून आणि टेबलाखालून पैसे देऊन कामं करून घेण्याची वृत्ती बंद होवो यासाठी हा फार चर्चेत नसणारा किंवा असे अनेक सिनेमे कधीतरी कारणीभूत ठरो अशी आशा आपण फक्त व्यक्त करू शकतो !

**– प्रा. श्रीपाद जोशी**

•••

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### लॉकडाउन विशेष गुरुपौर्णिमा

जोशी बेडेकर महाविद्यालयात पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे दरवर्षी द्वितीय वर्षातील विद्यार्थी महाविद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी करत असतात. परंतु यंदा कोरोनाच्या संकटामुळे महाविद्यालयाचे दरवाजे बंद असल्याने विद्यार्थ्यांसमोर प्रश्न निर्माण झाला होता. पण खचून न जाता विद्यार्थ्यांनी शक्कल लढवली. गुरुपौर्णिमा साजरी करता यावी यासाठी ऑनलाइन स्वरूपात गुरुपौर्णिमा साजरी करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांनी घेतला. कॉलेज प्रशासनाने देखील या ऑनलाईन कार्यक्रमासाठी त्वरित अनुमती दिली आणि आजचा गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम सुंदररित्या पार पडला. या ऑनलाईन कार्यक्रमासाठी झूम अॅपचा वापर सगळ्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी केला. जोशी बेडेकर महाविद्यालय आयोजित ऑनलाईन गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम आणि पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कविता, अभंग, कथेच्या स्वरूपात विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुविषयी आदर व्यक्त केला. दरम्यान शिक्षकांविषयी बोलताना काही विद्यार्थ्यांना भरून आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे अनेक शिक्षक उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. विमुक्ता राजे मॅडम आणि प्राध्यापिका मानसी जंगम मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यक्रमासाठी लाभले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### इंटर्नशिपही ऑनलाइन...! 'व्हीपीएम' पॉलिटेक्निकचा उपक्रम, राज्यभरातील ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग (८ जून ते १७ जून २०२०)

इंजिनीअरिंगच्या पदविका अभ्यासक्रमात दुसऱ्या वर्षानंतर विद्यार्थी प्रत्यक्ष कारखान्यात जाऊन कामाचा अनुभव घेत असतात. संचारबंदीच्या काळात इतर अभ्यास ऑनलाइन होत असला तरी इंटर्नशिपची प्रक्रिया बंद झाली होती. ठाण्यातील व्हीपीएम पॉलिटेक्निकने मात्र जगभरात असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आठ दिवसांचा वेबिनार आयोजित करून विद्यार्थ्यांना ऑनलाइन इंटर्नशिपचे धडे दिले.

गेले चार दशके कार्यरत असलेल्या येथील विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन संस्थेत शिकलेले अनेक विद्यार्थी जगभरात यशस्वी उद्योजक म्हणून कार्यरत आहेत. तंत्रनिकेतनमधील प्राध्यापकांनी त्यांच्याशी संपर्क साधून उद्योजक आणि विद्यार्थी यांचा संवाद घडवला. राज्यातील २० तंत्रशिक्षण संस्थांमधील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या आठ दिवसीय वेबिनारमध्ये नोंदणी केली. प्रत्येक सत्रात सरासरी शंभरहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. सध्या अमेरिकेत असलेले 'व्हीपीएम' चे माजी विद्यार्थी राजेंद्र कदम आणि अमित महाजन यांनी या कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले. व्हीपीएम महाविद्यालयाचे प्राचार्य डी. के. नायक, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे, इन्स्ट्रुमेन्टेशनच्या प्रमुख वैशाली जोशी यांनी विद्यार्थी-उद्योजक समन्वय साधला. स्नेहबंध या 'व्हीपीएम'च्या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेच्यावतीने हा कार्यक्रम पार पडला.

‘आशिदा’ इलेक्ट्रॉनिक्सचे सुयश कुलकर्णी, एन. के. इन्स्ट्रुमेन्टेशन नितीन केळकर, मिराज इन्स्ट्रुमेन्टेशन सर्व्हिसेसचे राजेश सोलंकी, अॅडव्हान्स ऑटोमॅटिक सिस्टीमचे देवेंद्र प्रधान, पॉवरमॅक्स एनर्जीचे दिनेश पोतनीस, टेक्नोव्हा इंजिनीरिंगचे नेहा आणि उदय मुठे, अमेरिकेत वास्तव्य करणारे पोन्गबोटचे राजेंद्र कदम आणि अमेरिकेतील तीन कंपन्यांचे मालक असलेले अमित महाजन यांनी भाग घेतला. या कार्यक्रमामुळे संचारबंदीच्या काळात विद्यार्थ्यांना घरबसल्या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे यशस्वी असलेल्या उद्योजकांचे विचार, अनुभव ऐकता आले. त्यांच्याशी संवाद साधता आला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

जून – २०२० मधील कार्यक्रम / वार्ता

१ जून : डॉ. नितीन जोशी आणि डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी ऑनलाईन मिनी एमबीए अभ्यासक्रमाची आखणी पूर्ण केली.

डॉ. नितीन जोशी हे हॅपीनेस लाइफ कोच बाय ब्रॅको पब्रीक या कार्यक्रमास उपस्थित राहिले.


The CPD Accreditation Group

CPD Certificate of Attendance

This is to certify that

Nitin M Joshi

Has completed the following CPD accredited activity:

Certified Happiness Life Coach

Braco Pobric

For High Impact Consulting, Coaching and Training

6/7/2020

३ जून: सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची आयक्यूएसी आणि एफडीपी समिती, मुंबई विद्यापीठाचा माहिती तंत्रज्ञान विभाग आणि मायक्रोसॉफ्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘ऑफलाइन ते ऑनलाइन अध्यापन’ या विषयावरील ५ दिवसांच्या ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमाला (एफडीपी) डॉ. पल्लवी चांदवसकर आणि प्रा. विभूती सावे उपस्थित राहिल्या.


SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE

(Arts, Science and Commerce)

Internal Quality Assurance Cell and Faculty Development Programme Committee

In Association with

Department of Information Technology University of Mumbai

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Mumbai Regional Centre

and

Microsoft

organised

FDP on 'Evolution from Offline to Online Teaching'

This is to certify that

Mr./Ms./Dr. Dr. Pallavi Chandwaskar

has participated in the five-day online Faculty Development Programme from 30th May, 2020 to 3rd June, 2020 on the topic 'Evolution from Offline to Online Teaching'

१-५ जून : प्रा. कंचन अक्षय आणि डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा यांनी ऑनलाईन सॉफ्ट स्किल प्रोग्रामच्या तिसऱ्या तुकडीचे प्रशिक्षण आयोजित केले. यात ३१ जण सहभागी झाले.

४ जून : डॉ नितीन जोशी यांनी गोल सेटिंग या विषयावर व्हिडिओ तयार केले.





४-६ जून : प्रा. कृणाल के. पुंजानी हे ‘रायटिंग हाय इम्पॅक्ट रिसर्च पेपर्स, इफेक्टीव्हली अँड एफिशिअंटली’

या विषयावरील ३ दिवसांच्या ऑनलाइन प्राध्यापक विकास कार्यक्रमाला (एफडीपी) उपस्थित राहिले.

६ जून : डॉ. नितीन जोशी यांना 'हॅपीनेस कोच' म्हणून प्रमाणपत्र मिळाले.




६ जून: प्रा. सिद्धेश सोमण यांनी ''ॲडव्हांन्सिंग युअर करिअर इन फिनान्स विथ सीएफए'' या विषयावर वेबिनार आयोजित केले. यात २५ जण सहभागी झाले.




७ जून : डॉ. नितीन जोशी यांनी युडमी तर्फे आयोजित डिजिटल मार्केटींग कोर्स करण्यास सुरुवात केली.

८-१० जून : प्रा. कृणाल के. पुंजानी हे 'बिझिनेस मॅनेजमेंट मधील नवीन आव्हाने' या विषयावरील ३ दिवसांच्या ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

८-१५ जून : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी रु. १०,०००/- मानधन मिळवून संशोधन सल्लागार म्हणून 'साहित्य पुनरावलोकन आणि प्रश्नावली आखणी, या संदर्भात पीएचडी स्कॉलरचे यशस्वीरित्या मार्गदर्शन केले.

१२ जून : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि एमएमएसचे विद्यार्थी पूर्वा अजगावकर, रेवती पदतुरे, सयाली पलाव आणि सुयश पाटील यांनी लाइव्ह यू ट्यूब वरून ब्रीम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.




BRIMS CONNECT MAY 2020

१५-१९ जून : डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. कृणाल के. पुंजानी आणि प्रा. महेश भानुशाली यांनी ''हाऊ टू पब्लिश रिसर्च पेपर इन स्कोपस इंडेक्स्ड जर्नल : अ स्टेप बाय स्टेप ॲप्रोच'' या विषयावर ५ दिवसांच्या ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमाच्या तिसऱ्या तुकडीचे यशस्वीरित्या आयोजन केले.




१५-२५ जून: डॉ. स्मिता जपे, प्रा. दीप्ती पेरिवाल, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. सिद्धेश सोमण यांनी 'लर्न हाऊ टू इन्व्हेस्ट इन स्टॉक मार्केट्स' या विषयावर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. यामध्ये एकूण ३५ जण सहभागी झाले.




१६ ते २० जून : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या आयक्यूए समिती तर्फे डॉ. पल्लवी चांदवसकर आणि प्रा. संदीप मोघे यांनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्स मधील गुणवत्ता उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांच्या समाधानाचे सर्वेक्षण आयोजित केले.

१७ जून : डॉ. नीतिन जोशी यांनी पॅसिफिक युनिव्हर्सिटीसाठी ऑनलाईन पीएचडी व्हायवा परीक्षेचे आयोजन केले.

१७ जून : ॲडव्हान्सेस इन सायन्स टेक्नोलॉजी अँड इंजिनिअरिंग सिस्टिम्स जर्नल (स्कॉपस इंडेक्सड जर्नल) या नियतकालिकासाठी समीक्षक (Reviewer) म्हणून प्रा. विभूती सावे यांची निवड झाली.

१८ जून : डॉ. स्मिता जपे यांची, आंतरराष्ट्रीय SKIREC पब्लिकेशन्समध्ये दोन वर्षांसाठी संपादकीय मंडळाच्या सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.




२० जून : डॉ. नीतिन जोशी, वेणुगोपाल यांच्या ‘डीसायरेबल स्किल्स’ कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

२१ जून : एमएचआरडी आयआयसी तर्फे आयोजित ‘राष्ट्रीय नावीन्यता’ स्पर्धेसाठी प्रा. कृणाल के. पुंजानी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम वर्षातील एमएमएसचे विद्यार्थी पूर्वा अजगावकर, रेवती पदतुरे, सयाली पलाव, सयाली वालंज, अदिबा मुकादम, तन्वी कोलते आणि सोनिया वर्मा यांच्या पथकाने ‘आयडिया’ दस्तऐवज तयार केला. आणि याची संबंधित माहिती एमएचआरडी आयआयसी वेबपोर्टलवर अपलोड केली गेली.

२४-२९ जून: प्रा. कृणाल के. पुंजानी, आयआयएम बी तर्फे आयोजित प्रा. सीमा यांनी घेतलेल्या ‘डिजिटल मार्केटिंग ए टू झेड’ विषयावरील ५ दिवसांच्या ऑनलाईन अभ्यासक्रमाला उपस्थित राहिले.

३० जून : डॉ. नीतिन जोशी ‘लीडरशिप इसेन्शिअल’ या अभ्यासक्रमात सहभागी झाले.

ब्रीम्सच्या आय आय सी विभागाचे सदस्य, प्रा. कृणाल के पुंजानी, डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. महेश भानुशाली, प्रा. संदीप मोघे यांनी ‘इनोबिझ’ - इनोव्हेशन स्पर्धा (जून) आयोजित केली व त्यांच्या सोल्यूशन नोट्स आणि सर्व संघांचे मूल्यांकन करण्यासाठी वरिष्ठ परीक्षक गटाशी समन्वय साधला.


डॉ. अर्लोफ जॉन व्हीएरा यांनी संक्षिप्त अशा २ मॉड्यूलच्या, ३६ तासांच्या व ५००० रुपयांच्या (पीपीआयसी आणि एलएम मॉड्यूल) पुरवठा साखळी व्यवस्थापनाच्या (एस सी एम) ऑनलाईन अभ्यासक्रमाची आखणी केली आणि २८ जून २०२० रोजी त्याचे उद्घाटन व्याख्यान आयोजित करण्यात आले.







डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा यांनी लिहिलेला लेख सप्लाय चेन पल्स जर्नल (आयएसएसएन ०९७५-७०१५) खंड ११, अंक १, जाने-जून २०२० मध्ये प्रकाशित झाला.




खालील वेबिनार किंवा अभ्यासक्रमांना प्राध्यापक उपस्थित राहिले.

| Faculty / Staff | Topic | Date |
|---|---|---|
| Dr. Nitin Joshi | Radhe Foundation on Covid 19 | 5th June |
| Prof. Kanchan Akshay | "What are the skills for future and new way of working" by NPTEL | 19th June |
| Dr. Pallavi Chandwaskar<br>Prof. Sandeep Moghe<br>Mr. Vaibhav Pandit | " AQAR Writing and Submission as per New NAAC Guidelines" | 6th and 7th June |
| Dr. Arloph John Vieira | Digital transformation of Pharma and Healthcare Industry | 2nd June |
| | Interview with Sunil Jain, CEO & ED of Hero Future Energies | 3rd June |
| | Digital transformation of Pharma and Healthcare Industry | 4th June |
| | Digital transformation of Pharma and Healthcare Industry | 5th June |
| | Attended Webinar " Atmanirbhar Bharat-Self Reliance as a growth strategy" | 5th June |
| | Skilling in Changing Times: Life Post Covid Tines | 6th June |

| | | |
|---|---|---|
| Dr. Arloph John vieira | Understanding Journal Indexing & Citation database | 13th June |
| | Paradigm Shift in Indian Economy-Challenges & Opportunity for Direct Benefit Transfer(DBT) | 14th June |
| | Digital Conference on Emerging Technologies for Business continuity and Efficiency | 15th June |
| | Counselling Courses at SIES Institute of Comprehensive Education | 16th June |
| | VUCA: A new perspective | 16th June |
| | YLC session on HRM During Covid Scenario | 16th June |
| | From Make in India to Innovate in India | 16th June |
| | The Digital Only Launch | 17th June |
| | How AI can improve Drug Manufacturing and Supply Chain efficiency | 17th June |
| | Global Impact of Covid | 18th June |
| | Elets Higher & Technical Education Virtual Conclave, West India Confirmation | 18th June |
| Dr. Arloph John vieira | Optimisation of Working Capital as a driver for change | 20th June |
| | Watch the mystic Sadhguru Talking | 21st June |
| | Digital Fitness for Logistics Service Providers | 23rd June |
| | Everything you need to know about Transport Visibility | 23rd June |
| | Redesigning Hospital Models in India for Pre & Post Covid - A paradigm Shift | 23rd June |
| | Make in India via South and South East Asia: A strategic Opportunity: Doing Business in Bangladesh and Myanmar | 24th June |

| | | |
|---|---|---|
| | Economic Times Supply Chain Mgt and logistics -Virtual Summit | 25th June |
| | How Supply Chain Planning can ready you for next disruption | 25th June |
| | YLC session Intellectual Property Rights for Industry | 26th June |
| | Monthly: GAP analysis closure with AI with Chris Tyas | 30th June |
| Prof. Krunal K. Punjani | 'ORCID ID' conducted by B. N. Bandodkar College | 1st June |
| | 'Evolution from Offline to Online Teaching' - By Dr. Yogendra Pal - IIT Bombay | 2nd June |
| | 'Evolution from Offline to Online Teaching' - By Prof. Ravindra Kulkarni - Hon. Pro Vice Chancellor, Univ. of Mumbai | 3rd June |
| | Economic Times Brand Equity on "The Gateway to Great Customer Experience" | 3rd June |
| | Economic Times BrandEquity on "Story Telling to Stay Relevant in Times of COVID-19" | 4th June |
| | "Different Approaches in Management Research" conducted by Univ. of Mumbai Thane Sub Campus & VES Institute of Mgt. Studies & Research | 4th June |
| | MHRD IIC online session on the launch of YUKTI 2.0 by hon'ble Minister of HRD, AICTE Chairman & other dignitaries | 23rd June |
| | CII Webinar on "Handling Uncertainty and Anxiety due to the Coronavirus Pandemic" by Prof. Rajkumar Pant, IIT B. | 24th June |

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

संकुचित नव्हती ही गोष्ट त्यांच्या तत्कालीन लेखावरून सिद्ध होत आहे. 'इंग्रजी इतिहास, 'इंग्रजी वाङ्मय, इंग्रजी शास्त्रे इंग्रजी हुन्नर वगैरे विद्या कोणाही विद्यार्थ्यांचे मन विकसित करून, त्याच्या अंगात व मनात देशाभिमान वगैरे सद्गुण उत्पन्न करण्यास लायक आहेत याबद्दलही वाद नाही .बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानातील न्याय ,व्याकरण आदी प्राचीन शास्त्र किती जरी उपयोगी असली तरी देशाभिमान, राज्यव्यवस्था ,राजनीती, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्र राष्ट्रांचा परस्पर संबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्या विषयांचे ज्ञान लागते. त्या विषयांचे शिक्षण या आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून मिळत नाही'.

वरील उदाहरणावरून असे दिसते की, टिळकांनी इंग्रजी शिक्षणाची जी स्तुती केली आहे या मताबद्दल पुढच्या काळात त्यांनी बराच बदल केला. टिळक म्हणतात की, 'आरंभी तर कित्येक मुत्सद्यांनी असेही म्हटले होते की', 'तुम्हास आम्ही जे इंग्रजी शिक्षण देत आहोत ते तुमच्या अंगी राज्य करण्याची योग्यता यावी म्हणून देत आहोत आणि ती आली म्हणजे आम्ही येथील आपले चंबुगबाळे आटपून आमच्या प्रदेशात परत जाऊ'.ज्या लोकांनी अशा हेतूने व बुद्धीने हिंदुस्थानातील लोकांना पाश्चिमात्य शिक्षण देण्याची सुरुवात केली त्यांच्या सदूहेतूची आम्ही मोठ्या आनंदाने तारीफ करतो. परंतु दुःखाची गोष्ट ही की, हा सदूहेतू, ही सदूबुद्धी शेवटपर्यंत टिकली नाही.

टिळकांनी, 'खरे विद्यापीठ कोणते'? या शीर्षकाचा २५ फेब्रुवारी १८९६ रोजी एक अग्रलेख केसरीमध्ये लिहिला. या लेखामध्ये भारतात पन्नास वर्षांपासून सुरू असलेल्या इंग्रजी शिक्षणाच्या फलश्रुतीवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. टिळकांच्या मते इंग्रज सरकारने लादलेले हे शिक्षण विशिष्ट दिशेने फलद्रूप होत नाही हे पाहून त्यांची फार निराशा झाली. टिळक लिहितात, ' नेमके जे घडायला पाहिजे ते घडत नाही असे दिसून आले. दुधाने ज्याप्रमाणे ताकाचे अनुकरण करावे त्याप्रमाणे युरोपियन विद्यापीठाचे आमच्या देशातील विद्यापीठे हे अनुकरण होय. या संस्था कशा असाव्यात, तशा नसल्यामुळे कोणत्याही शास्त्राचा शोधक बुद्धीने आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ अलीकडे पैदा होत नाहीत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धी अथवा योग्यता आमच्या अंगात नाही असे नाही .ज्या देशात पाणिनी, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य वगैरे विद्वान पूर्वकाली होऊन गेले त्यात सध्या लुई पाश्चर, एडिसन, मिल वगैरे गृहस्थांप्रमाणे विद्वान का निपजू नयेत याचे खरे कारण शोधून काढून त्याचा प्रतिकार करणे हे प्रत्येक विद्या बुद्धी इच्छिणाऱ्यांचे कर्तव्य आहे. सुधारलेल्या देशात विद्यापीठांची व्यवस्था गुरूंकडे असते. अध्ययन व अध्यापन यात ते आयुष्य घालवितात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे खरे गुण-दोष अथवा अडचणी त्यांना समजून येतात. गुरूंच्या विद्या अभ्यासाचा आणि सद्वर्तनाचा परिणाम त्यांच्या मनावर होण्यास गुरुजी खरोखर विद्या व्यासंगी राहून छात्रवासी वर्गाशी प्रेमभावाने वागणारे असले पाहिजेत. तसला प्रकार आमच्याकडे नाही. मुंबई विद्यापीठ १८५७ साली स्थापन झाले. पण तेव्हापासून या संस्थेतून एकही जगप्रसिद्ध विद्वान निघू नये हे आश्चर्य नव्हे काय? तेलंग, रानडे, भांडारकर वगैरे काही विद्वान यापूर्वी निघाले आहेत. पण त्यापैकी काही इतर धंद्यात शिरल्यामुळे शास्त्र अभ्यासाच्या कामी त्यांचा जसा उपयोग व्हावा तसा झालेला नाही. तरी ते कायद्याच्या अभ्यासांत गढून गेले आहेत. पण त्याचा उपयोग काय? ज्याने समरांगणी अश्वारूढ होऊन दोन हात करावयाचे त्यांनी आपले कौशल्य घरात बायकोच्या नथीतून तीर मारण्यात खर्च करावे तसा प्रस्तुतचा प्रकार आहे. आमच्या विद्यापीठात खरे विद्याव्यासंगी गुरु नाहीत. पदव्यांचे शिक्के ठोकण्यापलीकडे काही काम चालत नाही. विद्यापीठ ही परीक्षा घेणारी रजिस्टर्ड

कंपनी झाली आहे असे म्हटले तरी चालेल.'

टिळकांनी वरील लेखात जो संदर्भ दिला आहे त्यातून इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांचे कुठलेही मूलगामी उत्थान झाले नाही हे कळते मात्र भारतीय विचार परंपरेने दिलेले साक्षेपी विचार नष्ट होऊन केवळ पोपटपंची करणारा व खर्डेघाशी करून इंग्रज सरकारला कारकुनी करण्यात मदत करणारा वर्ग प्रचलित शिक्षण व्यवस्थेत निर्माण होत होता याचा टिळकांनी खेद व्यक्त केला आहे. आज २०२० मध्ये देखील टिळकांनी विद्यापीठाला 'परीक्षा घेणारी रजिस्टर्ड कंपनी' असे म्हटले आहे ते रास्त वाटते. टिळकांनी केसरीमध्ये मांडलेले विचार हे ते इंग्रजांनी लादलेल्या शिक्षणाबद्दल होते. मात्र भारत स्वातंत्र्य झाल्यापासून जे शिक्षण सध्या भारतात प्रचलित आहे त्या शिक्षणाकडे पाहून देखील मागच्या शंभर वर्षांत कुठलाही बदल झाला नाही असेच वाटते.

लोकमान्य टिळकांनी तत्कालीन इंग्रजी शिक्षणाची केलेली चिकित्सा ही आज सुद्धा आपल्याला डोळ्यात अंजन घालू शकते. युनिव्हर्सिटी ऊर्फ सरकारी हमालखाने हा १९ ऑगस्ट १९०२ रोजी टिळकांनी लिहिलेला केसरीतील अग्रलेख विशेष विचारशील आहे. त्यामध्ये टिळक असे म्हणतात की 'इंग्रजी शिक्षण एकांगी आहे व ते फक्त सरकारी नोकरीत लागणारे आवश्यक गुणच एतद्देशीय लोकांच्या अंगात आणण्याकरिता योजलेले आहे. या शिक्षणक्रमात तयार झालेल्या लोकांस धर्मनीती, शास्त्रीय शोध, धंदे शिक्षण वगैरे राष्ट्राच्या उत्कर्षास आवश्यक लागणाऱ्या ज्ञानाची व कलांची बिलकुल माहिती नसते.' नोकरी मिळण्याचे प्रमाणही उत्तरोत्तर कमी होत गेल्यामुळे अधिकाराचा दुजोरा कमी होऊन इंग्रजी शिकलेल्या यांच्या ज्ञानाचा अपुरेपणा आणि कच्चेपणा अधिकाधिक उघडकीस येत चालला. सारांश, आमच्या दृष्टीने पाहिले तर हल्ली चालू असलेल्या युनिव्हर्सिटीच्या शिक्षणात अनेक प्रकारचे फेरफार व्हावयास पाहिजेत, असे की, जेणेकरून युनिव्हर्सिटी म्हणजे खरोखरीच विद्वत्तेची किंवा विद्वानांची माहेरघरे होतील.निरनिराळ्या विषयात निष्णात असलेल्या प्रोफेसरांचा समुदाय, विद्यार्थ्यांच्या डोळ्यांदेखत सतत चालू असलेला विद्याव्यासंग, मोठी मोठी पुस्तकालये किंवा यांत्रिक उपकरणे वगैरे ज्या संस्थेत नेहमी दृष्टीस पडतील अशा संस्था येथे निघाल्या पाहिजेत असे आमचे म्हणणे आहे . परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी, की युनिव्हर्सिट्या स्थापन होऊन आज पन्नास-साठ वर्षे झाली तरीही त्या तशा प्रकारची सुधारणा करण्याचे सरकारच्या मनात येत नाही. युनिव्हर्सिटी म्हणजे कनिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकऱ्यांकरिता लागणारे उमेदवार तयार करण्याचे टाकसाळे किंवा हमालखाने होत; असे शब्दांनी नाही तरी कृतीने तरी सरकार स्पष्ट दर्शवित आहे .हल्ली सरकारी कॉलेजांतून तिसऱ्या-चौथ्या प्रतीच्या प्रोफेसरांचे भरताड भरले होते ते कमी करून त्याच्या ऐवजी खरोखरच पहिल्या प्रतीचे विद्वान प्रोफेसर आणण्याची सूचना कमिशनने करावयास पाहिजे होती. पण तशी किंवा त्या प्रकारची दुसरी कोणतीही सूचना हल्लीच्या रिपोर्टमध्ये आढळून येत नाही. चांगल्या लायब्ररी किंवा लॅबोरेटरी स्थापन कराव्या याबद्दल सूचना केलेली आहे, पण सरकार जोपर्यंत या कामाकडे सढळ हाताने पैसा खर्च करण्यास तयार नाही तोपर्यंत ही सूचना कशी अमलात यावी हे आम्हाला समजत नाही.

१९०४ साली मद्रासचे लॉर्ड बिशप यांनी भारतीय व जपानी लोकांमध्ये झालेल्या इंग्रजी शिक्षणाच्या प्रचाराचे व प्रसाराचे मूल्यमापन करणारे भाषण दिले होते. या भाषणात बिशप यांनी, 'भारतात इंग्रजी शिक्षणाची फलश्रुती व्यवस्थित झाली नाही याचे कारण मुळात भारतीयांच्या अवगुणांमुळे व त्यांच्यातील जातिभेदांमुळे हे झाले नाही' असे म्हटले होते. या मुद्याला उत्तर देण्यासाठी ६ डिसेंबर १९०४ रोजी 'जपान आणि हिंदुस्थान' या शीर्षकाचा एक अग्रलेख टिळकांनी लिहिला व त्यामध्ये बिशप महाशयांच्या मतांचा खरपूस

समाचार घेतला. टिळक म्हणतात, 'रसायन शास्त्र, भूगर्भशास्त्र', उद्योगधंदे किंवा नाना प्रकारच्या कला या शिकण्याकरिता दरवर्षी शेकडो विद्यार्थी जपानने ज्याप्रमाणे गेल्या तीस-चाळीस वर्षांत परदेशात पाठविले तसे हिंदुस्थान सरकारने केले आहे काय? नाही म्हणायला आता कोठे दर इलाख्याला दोन स्कॉलरशिप ठेवलेल्या आहेत. पण देशाचे हे खरे हित जर करावयाचे होते तर यापूर्वी शेकडो हिंदी विद्यार्थी परदेशात पाठवावयास नको होते काय?

घरामध्ये शोभेसाठी किंवा चैनी करिता कुंडीतून लावलेल्या झाडांमध्ये आणि मोठ्या बागेत वाढणाऱ्या झाडांमध्ये जे अंतर आहे तेच हिंदी आणि जपानी विद्यार्थ्यांत दिसून येते. स्वतंत्रतेचे वारे मिळून गगनचुंबी वाढलेला मंदार वृक्ष कोणीकडे आणि मेघदूतात सांगितल्याप्रमाणे यक्षाच्या बायकोने आपल्या रत्नवापी जवळ कौतुकाने लावलेला 'हस्तप्राप्य स्तबक नमितो बालमंदारवृक्षः, बाल मंदार कुणीकडे! हिंदुस्थानातील युनिव्हर्सिटीतून किंवा इतर नोकरखाण्यांतून जे विद्वान बाहेर पडतात ते या बाल मंदार वृक्षासारखे होत. ते गोंडस रहावे, त्यांची फळे व पुष्पे युरोपियन अधिकारी वर्गास फार प्रयास न पडता खुडता यावीत, अशा बेताबेतानेच त्यांची वाढ होण्याबद्दल पहिल्यापासून खबरदारी घेण्यात येते! पाश्चिमात्य शिक्षणाने जपान इतका हिंदुस्तान सुधारला नाही हे तर निर्विवाद आहे. अर्थात त्याचा दोष कोणावरतरी लादला पाहिजे. राज्यकर्त्यांवर लादावा तर ते पडले आपल्या जातीचे, तेव्हा हिंदी लोकांवर दोषाची गोणी लादून बिशप साहेब मोकळे झाले आहेत ! पण आम्ही त्यास सविनय असे कळवितो की, ह्या त्यांच्या हातचलाखीने किंवा 'अशुभवर्तमानाने' फसून जाण्याइतके आता आम्ही मूर्ख राहिलो नाही. जपान चाळीस वर्षांत पुढे येऊन पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीत बसले आणि आम्ही दरवर्षी अधिकाधिक हताश, हतवीर्य आणि परकीयांची ओझी वाहणारे बनत चाललो. याचा योग्य खुलासा जर कोणास पाहिजे असेल तर तो 'स्वतंत्रता' या एकाच शब्दाने होईल.

टिळकांनी पुकारलेल्या स्वदेशी चळवळीकडे विद्यार्थी ओढले जात होते . १९०५ साली डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल मिस्टर सेलबी यांनी आपल्या एका जुन्या विद्यार्थ्याच्या विनंतीस मान देऊन जे पत्र पाठविले ते 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले. या पत्रामध्ये सेल्बी यांनी 'स्वदेशी चळवळीमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊ नये' अशी भूमिका व्यक्त केली होती. त्यावर टीका करणारा खणखणीत लेख 'हे आपले गुरुजी नव्हेत क्रमांक १' या शीर्षकाचा १७ ऑक्टोबर १९०५ रोजी केसरी मध्ये टिळकांनी लेख प्रकाशित केला. त्यात टिळकांनी शिक्षण व्यवस्थेवर सडकून टीका केली आहे. टिळक लिहितात, 'आमच्या देशात सरकारने जी कॉलेजीस व युनिव्हर्सिटी काढल्या आहेत त्यात सरस्वती देवीस राजसत्तेची दासी बनविली आहे, आणि लॉर्ड कर्झन साहेबांनी तर हे दास्यत्व चिरकाल कायम ठेवण्याचा बंदोबस्त केला आहे. पाश्चात्त्य देशात ज्या युनिव्हर्सिटी किंवा कॉलेजीस आहेत तेथे हे राष्ट्रीय विचारांची जशी चर्चा होते अथवा राष्ट्रास हिताच्या गोष्टी कोणत्या आणि अहिताच्या गोष्टी कोणत्या यांचा जसा निर्णय होतो, तसा इंग्रज सरकारने या देशात काढलेल्या कॉलेजांतून किंवा युनिव्हर्सिटीतून होणे अशक्य आहे. आमच्या युनिव्हर्सिटी व कॉलेजीस म्हणजे सरकारच्या ताटाखालची मांजरे होत. किंबहुना प्रजेने कोणत्या स्थितीत राहावे,याबद्दल सरकारचे विचार असतील तेवढेच विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवावे, यापेक्षा जास्त उदात्त विचारांचा त्यांच्या मनात विटाळ लागू नये, अशा प्रकारची खबरदारी सरकारी शाळांतून कॉलेजांतून किंवा युनिव्हर्सिटीच्या आतून घेतली जावी याबद्दल सरकारचा कटाक्ष आहे. लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत या कटाचा अगदी कळस झाला आहे . हिंदुस्तानवर ज्या परकीय लोकांचा अंमल आहे त्यांच्या जातीचे हे शिक्षक असून, या राज्यकर्त्यांचे राजकीय धोरण शिक्षणाच्याद्वारे नवीन

संगीत म्हणजे परमेश्राने दिलेली वैभवशाली व सुंदर देणगी आहे.

पिढीच्या मनात बिंबविण्याच्या करिता यांचा अवतार आहे. शेक्सपिअरची नाटके किंवा बेकनचे ग्रंथ शिकविण्यास, किंवा त्यांच्यावर नोट्स लिहून ही पुस्तके विद्यार्थ्यांकरिता प्रसिद्ध करण्यास हे लायक आहेत व तेवढ्यापुरती त्यांची योग्यता ओळखूनच आम्ही फीच्या रूपाने सरकारास त्याचा मोबदला देत असतो. पण राष्ट्रभक्ती, राष्ट्रहित, राजकीय चळवळ, राजकीय उन्नतीचे प्रयत्न वगैरे बाबतीत यांचे मत घेणे म्हणजे उंदरांनी बोक्याचे मत घेण्यासारखेच आहे ! प्राचीन काळी आर्यभूमीत गुरूला जो मान मिळत असे, त्या मानास पात्र होणारा गुरू निराळा, आणि आणि पैशाकरिता सरकारच्या धोरणाने शेक्सपिअर शिकविणारा हल्लीचा गुरू निराळा !

सेल्बी साहेब म्हणतात की, 'स्वदेशी चळवळ देशात हितकारक आहे, पण विद्यार्थ्यांनी चळवळीत पडू नये.' या विधानावर टिळक म्हणतात की, 'चेंबरलेनच्या चळवळीत ऑक्सफर्ड, केंब्रिज मधील विद्यार्थी पडले नाहीत काय? आमचे विद्या खाते जर स्वतंत्र असते व निसर्गतः त्या देशाचे हितचिंतक विद्वान प्रोफेसर त्यात असते, तर ते सुरेंद्रनाथ बॅनर्जी प्रमाणे स्वदेशी चळवळीवर व्याख्याने देण्यात गावोगाव फिरले असते.

सेल्बी साहेबां सारखे आमचे गुरूच नव्हेत. एबीसी शिकविण्याकरिता, इंग्रजी भाषा शिकविण्याकरिता, ऑफिसात खर्डेघाशी आम्हास शिकविण्याकरिता हे सरकारने नेमलेले नोकर होत. त्यांना जुन्या धर्मशास्त्रात सांगितलेल्या गुरूप्रमाणे मान देणे, म्हणजे नवसास पावणाऱ्या म्हसोबास परब्रह्मपदास चढविणे होय! फी करिता , सरकारी पगारा करिता , इंग्रजी भाषा बोलण्याची व लिहिण्याची कला शिकविणारे हे भाडोत्री कामगार आहेत.

रँग्लर परांजपे जेव्हा फर्गसन कॉलेजात प्रिन्सिपल होते तेव्हा परकीय कपड्यांची होळी करण्याच्या कार्यक्रमात विनायक दामोदर सावरकर विद्यार्थीदशेत असताना सामील झाले होते. या कार्यक्रमात सहभागी झाल्याबद्दल फर्गसन कॉलेजच्या प्रिन्सिपॉल यांनी सावरकरांना दहा रुपये दंड भरून कॉलेजच्या बोर्डिंगमधून काढून टाकले. ही गोष्ट टिळकांना समजल्यावर त्यांनी २४ ऑक्टोबर १९०५ रोजी 'हे आमचे गुरूच नव्हेत क्रमांक २' या शीर्षकाचा अग्रलेख लिहिला. त्यामध्ये टिळक असे म्हणतात की,

'फर्गसन कॉलेजातील एक विद्यार्थी स्वदेशी चळवळी संबंधाने भरलेल्या विद्यार्थ्यांच्या सभेत बोलला म्हणून सदर कॉलेजातील प्रिन्सिपॉल यांनी त्यास दहा रुपये दंड करून, सदर शाळेच्या बोर्डिंगातून त्यास काढून टाकले, हे पाहून कपाळास हात लावल्या खेरीज राहवत नाही. राष्ट्रीय चळवळीत नवीन पिढीने किती पडावे हे विद्यार्थ्यास शिकविण्यास आपले असले गुरू निरुपयोगी आहेत. कृष्ण भक्तीस लागलेल्या प्रल्हादाने ज्याप्रमाणे आपल्या बापाने नेमलेल्या गुरूंचा उपदेश सदर कामापुरता झुगारून दिला; तसाच राष्ट्रीय चळवळीच्या कामी सरकारी कॉलेजातील गुरुंनी केलेला उपदेश क्षणभर आम्ही बाजूला ठेवला पाहिजे. शाळेच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी म्हणून राजकीय चळवळीत पडू नये; मोठ्यांनी राजाचे नोकर म्हणून पडू नये; आणि म्हाताऱ्यांनी पेन्शनर म्हणून पडू नये; जन्मल्यापासून मरेपर्यंत चुकून एखादा मनुष्य गेल्यास जावा, बाकी सगळे चिरडून जाऊन जन्मल्यापासून मरेपर्यंत एक सारखे दास्यत्वात मुरले जावे, आणि एक पिढी अशी मुरली म्हणजे तिचे अनुवंशिक संस्कार दुसऱ्या पिढीत मिळून अशा रीतीने राष्ट्रभक्तीशून्य पुरुषांची सरकारी नोकरी करिता परंपरा तयार व्हावी!'

वर उल्लेख केलेल्या अनेक अग्रलेखांतून लोकमान्य टिळकांना अपेक्षित असलेला शिक्षक व शिक्षण या दोन्ही संकल्पनांचा अंदाज मनाशी बांधता येतो. टिळकांच्या दृष्टिकोनातून शिक्षक हा तरुण पिढीला नीती, ज्ञान, विनय, शौर्य वगैरे गुणांनी संपन्न करून राष्ट्राचे काम अव्याहत सुरू ठेवतो व व्यावहारिक लोभापासून अलिप्त,

शांत, ज्ञानसंपन्न, जितेंद्रियद, निस्पृह आणि सत्त्वशील असतो. अरण्यात वास करणाऱ्या अशा गुरूंच्या आश्रमात जे शिष्य काही वर्षे काढीत, त्यांच्यामध्ये अशा प्रकारच्या गुरूबद्दल किंवा आचार्यांबद्दल स्वभावतः पूज्य बुद्धी उत्पन्न होत असे.

टिळकांच्या मते अशा गुरूंच्या आश्रमात शांतपणे, समृद्धीने, निर्लोभीपणाने आणि स्वतंत्र रीतीने विचार होत असे व त्यातून तेजस्वी व आपल्या कर्तव्यास जागणारी पिढी निर्माण होत असे. आपल्या गुरू समोर जर आपण एकदा प्रश्न मांडला तर त्याचे उत्तर राजापासून रंकापर्यंत कोणाचीही भीड न धरता गुरुजी निष्ठूरपणे सांगतील असा विश्वास विद्यार्थ्याला होता. टिळक म्हणत असत की, 'धर्मशास्त्रात पित्यापेक्षा गुरूला अधिक मान द्यावा असे सांगितले आहे. मात्र ते गुरू ज्ञानसंपन्न निस्पृह व निर्मळ अंतःकरणाचे असले पाहिजेत.' टिळकांच्या दृष्टिकोनातून शिक्षण म्हणजे माणसाच्या सर्वांगीण विकासाला वाव देत देशाप्रती दुर्दम्य निष्ठा निर्माण करू शकणारे एक राष्ट्र उद्धाराचे साधन होय. व्यक्तीने केवळ स्वतःचा विचार न करता आपल्या सोबत समाजाचा व देशाचा विचार प्रामुख्याने करावा हा शिक्षणाचा खरा भाव आहे. टिळकांच्या स्मृती शताब्दी वर्षामध्ये आपण जेव्हा त्यांच्या शैक्षणिक विचारांचे मूल्यमापन करतो तेव्हा असे खेदाने म्हणावे लागते की, आज देखील शिक्षण क्षेत्रात म्हणावे तेवढे बदल झालेले नाहीत.

केवळ राजकीय अभिनिवेशाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे हे आजचे शैक्षणिक वास्तव आहे. परीक्षेच्या निकालात होत असलेला विलंब, विद्वत्तेच्या क्षेत्रात होणारा ऱ्हास, शिक्षण क्षेत्रातील झालेला जातीय व पक्षीय राजकारणाचा शिरकाव, शिक्षणातील नावीन्यपूर्णतेचा अभाव, ज्ञानदानापेक्षा कागदी घोडे नाचवण्याची कला अवगत करणे व शिक्षणसंस्थांकडे आपली खाजगी मालमत्ता म्हणून पाहण्याची सरकारची व राजकारण्यांची दृष्टी हे आजचे शैक्षणिक वास्तव आहे.

टिळक म्हणतात त्याप्रमाणे, 'विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन आपले काम भागले असे सुधारलेल्या राष्ट्रातील युनिव्हर्सिटीस वाटत नाही. शास्त्रांचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत जावा व प्रत्येक शास्त्रात काही ना काहीतरी नवीन शोध लागावा, या हेतूने त्या स्थापन झालेल्या असतात, व तो हेतू तडीस नेण्याकरिता, चांगल्या रीतीने निर्वाह चालेल असे वेतन देऊन, बरेच विद्वान गृहस्थ या युनिव्हर्सिटीतून, त्यांची योग्यता पाहून केवळ विद्यावृद्धी करण्याच्या इराद्याने ठेवलेले असतात. अशा प्रकारची विश्वविद्यालये असली म्हणजे शास्त्रास उत्तेजन येऊन विद्येची अभिवृद्धी कायमची होत असते'.

टिळकांनी जे अग्रलेख लिहिले ते इंग्रजांच्या परकीय शिक्षणानी हतबुद्ध झालेल्या पिढीकडे पाहून लिहिले. मात्र शिक्षणाचा हेतू काय? शिक्षण मिळाल्यानंतर त्याची फलश्रुती काय? व भारताला अधिकाधिक सर्वंकष प्रगत बनविण्यासाठी शिक्षणाचे उपाययोजन काय? या विषयांचा अभ्यास टिळकांच्या वरील विचारांच्या परिप्रेक्ष्यात नव्याने करावयास हवा अशी परिस्थिती सध्या उद्भवली आहे.

टिळकांच्या एकूण व्यासंगाचा पट आपल्यासमोर त्यांच्या अग्रलेखातील संदर्भांवरून उभा राहतो. प्राचीन भारतीय विद्या, संस्कृत, ज्योतिष शास्त्र, गणित, प्राच्यविद्या, तसेच तेव्हा उपलब्ध असलेल्या सर्व ग्रंथांचे, परकीय अभ्यासकांचे व प्राच्यविद्या विशारदांचे लेखन टिळकांनी बारकाव्याने अभ्यासले होते. वाघिणीचे दूध असलेल्या इंग्रजी भाषेसोबतच भारतीय विचार परंपरांचा अत्यंत साक्षेपी विचार करून टिळकांनी 'स्वदेशी' व 'राष्ट्रीय शिक्षण' या अत्यंत महत्त्वाच्या विचारांकडे आपले लक्ष वेधले आहे. टिळकांचे विचार हे आज देखील तेवढेच उपयोगी व मार्गदर्शक ठरतात व आपल्याला 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी उपयुक्त ठरतात. त्यांच्या स्मृती शताब्दी निमित्त टिळकांना सादर वंदन.

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.